
# मुंबई सर्वोदय मंडळ व ग्रंथाली

यांच्या संयुक्त विद्यमाने

वुलन मिल म्युनिसिपल शाळा, खोली नं.९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे.के.सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०० ०१६ दूरध्वनी : ०२२-२४३० ६६२४
Email:granthali01@gmail.com/ granthali02@gmail.com
mumbaisarvodaya@gmail.com


---




# मनस्वी

## बाबूराव चंदावार

प्रकाशन हस्ते

**प्रा.डॉ.यशवंत सुमंत**

**राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ**

प्रमुख उपस्थिती

विजय दिवाण - अध्यक्ष,मुंबई सर्वोदय मंडळ,
दिलीप चावरे - पत्रकार

## रविवार, २० मे २०१२

सायंकाळी ५.०० वाजता

मुंबई सर्वोदय मंडळ,

२९९ ताडदेव रोड, नाना चौक, मुंबई ४००००७

दूरध्वनी : २३८७२०६१

बाबूराव चंदावार यांचे आत्मकथन भारताच्या राजकीय इतिहासातील एक अत्यंत रोमहर्षक कालखंड आहे. आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण तसेच जेपी आणि इंदिरा गांधी यांच्यातील व्यक्तिसंबंधांवर अधिकारवाणीने लिहिणारे बाबूराव हे एकमेव म्हणावे लागतील. बालवयातच रागावून घर सोडले आणि बाबूराव सार्वजनिक कार्यात खेचले गेले. या प्रवासात त्यांना उत्तुंग उंचीचे अनेक मार्गदर्शक भेटले आणि त्यांच्या छायेत बाबुरावांची प्रगती होत गेली.

आणीबाणीच्या काळात विनोबा भावे यांचे एक-दोन निर्णय आवडले नाहीत म्हणून त्यांच्यावरही आक्षेप घेताना बाबूराव कचरले नाहीत. जेपी अमृतकोषाच्या संदर्भातही त्यांनी उपोषणाचे हत्यार उपसले. गुरुजनांनी सांगितलेल्या तत्त्वानुसारच बाबुरावांनी मार्गक्रमण केले. प्रसंगी त्यांनी तत्त्वाचा आग्रह धरताना गुरुजनांचेही ऐकले नाही. म्हणूनच 'मनस्वी'ह्या एका शब्दातच त्यांच्या जीवनपटाचे सार सामावलेले आहे.

**आपण या समारंभास अवश्य यावे, ही विनंती.**
**सुदेश हिंगलासपूरकर/विनायक गोखले**

---

कार्यक्रमस्थळी मूळ ५०० रुपयांचे पुस्तक ३०० रुपयांत मिळेल
व ग्रंथालीची अन्य पुस्तके सवलतीत उपलब्ध असतील.

ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मे २०१२ • मूल्य १० ₹

## यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त ग्रंथालीची १०० ठिकाणी ग्रंथयात्रा



यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी दिनी मुंबईतील ग्रंथप्रदर्शनास केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांची भेट



बारामती येथे ग्रंथगाडीस हिरवा झेंडा दाखवून यात्रेस आरंभ करताना (उजवीकडून) सुनेत्रा पवार, विजया पाटील आणि नगराध्यक्ष जयश्री सातव,

## ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रामार्फत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ




नीला सत्यनारायण यांच्या 'ओळखीची वाट' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनसमयी

नीला सत्यनारायण, रामदास भटकळ, अशोक पत्की, शंकर वैद्य आणि विनायक गोखले



प्रतिभा सराफ यांच्या 'दु:ख माझे कोवळे' या गझलसंग्रहाच्या प्रकाशनसमयी

विनायक गोखले, सदानंद डबीर, धनराज वंजारी, मंगेश पाडगावकर, शंकर वैद्य, प्राचार्य मुळये

प्रतिभा सराफ आणि सतीश सोळांकूरकर

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**मे २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

शिंचॅन ही मालिका सध्या बंद आहे. या द्वाड शिंचॅनसारखेच सध्या महाराष्ट्रातल्या सिंचनाचे झाले आहे. जलसिंचॅनधोरण हे शिंचॅनच्या द्वाडपणासारखे दिसते. नळयोजना आहेत, पण पाणी टँकरने पुरवले जाते! नळ कोरडे वा गंजलेले आहेत. धरणे आहेत, पण कालवे नाहीत. पाणी मुरते कुठे तेच कळत नाही. सध्या चाललेल्या चर्चेतून हे चित्र उभे राहिले आहे. पाणीप्रश्न बिकट झाला आहे. ७२ सारख्या दुष्काळाबाबत चिंता व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र स्थापनेच्या पन्नास वर्षांनंतर अशा चर्चा व्हाव्या आणि त्याचवेळी यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी साजरी व्हावी यासारखा विचित्र योग नाही. यशवंतरावांचे द्रष्टेपण सोडाच, त्यांच्याइतकी आस्था बाळगली तरी, गंभीर प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतलेली दिसेल. असे प्रश्न बरेच आहेत. दिलीप चावरे यांनी या अंकात महाराष्ट्राची सद्यस्थिती सांगणारा लेखाजोखा थोडक्यात मांडला आहे. नीलिमा कानेटकर यांनी कौटुंबिक कलहांच्या प्रश्नांवर समुपदेशन केंद्र स्थापन केले आहे. त्यांचे अनुभव व केंद्राची माहिती त्यांनी या अंकात लिहिली आहे.

अंजली कीर्तने, मल्हार ढगे, मनोहर नरांजे, मदन धनकर, कृष्णकुमार गावंड यांचे लेख, डॉ. माधवी मेहेंदळे यांनी उभा केलेला बालपणाचा काळ यातून सांस्कृतिक महाराष्ट्र दिसेल.

'ग्रंथाली'ने यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त महाराष्ट्रात शंभर ठिकाणी फिरती ग्रंथयात्रा आखली आहे. १ मे रोजी तिचा आरंभ बारामती येथून झाला. या ग्रंथयात्रेतून नव्याने समाजधारणा कळतील. त्याचे प्रतिबिंब 'रुची'तून पडावे असा प्रयत्न राहील. या यात्रेला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सहकार्य लाभले आहे.

**– संपादक**

# कवितांच्या सुंदरबनात : दुर्गा भागवत

## अंजली कीर्तने

७ मे २०१२. दुर्गा भागवतांचा दहावा स्मृतिदिन. दुर्गाबाईंच्या शेवटच्या दिवसांची मी साक्षीदार होते. मी त्यांच्यावर लघुपट करत होते. त्यानिमित्तानं त्यांना वारंवार भेटत होते. त्यांची प्रथमभेट आजही मनात दरवळते आहे. माघातल्या एका प्रसन्न सकाळी मी आणि अभिनेते विक्रम गोखले, दुर्गाबाईंना भेटायला निघालो होतो. हवेत थंडीची लहर. निळसर कोमट ऊन. अवतीभवती पानगळीचा पाऊस. गिल्डर लेनमधील राजेंद्रविहार या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर त्यांचं घर. आम्ही लिफ्टमधून वर पोचलो. घराचं दार उघडंच होतं. दारात होत्या, दुर्गाबाई! अगदी बारीकशा. खारीक आजी झालेल्या. व्हीलचेअरवर बसल्या होत्या. सुरकुत्यांची कलाकुसर असलेला चिंचोळा चेहरा. अंगात मातकट तपकिरी रंगाचा, नक्षीनक्षीचा गाऊन. मघातल्या पानगळीची वल्कलंच जणू त्या साध्वीनं परिधान केली होती. मक्याच्या कणसातील पिवळसर रेशमी धाग्यांसारखे केस. त्याची बारीकशी वेणी वळून रबरबँडनं नीटनेटकी बांधली होती.

विक्रमजींनी त्यांना सांगितलं, ''ही अंजली कीर्तने. हिला तुमच्यावर लघुपट करायचाय.'' दुर्गाबाईंची नजर माझ्याकडे वळली. स्थिरावली! त्यांनी सावकाशपणे माझं नाव उच्चारलं. ओठांजवळच्या चुण्या हलल्या. ओठांपासून डोळ्यांपर्यंत मंद स्मिताची झुळुक पसरली. सुरकुत्यांचं कमळ प्रसन्न हसलं. दुर्गाबाईंचं शरीर थकलं होतं; पण मन निस्तेज झालं नव्हतं. त्यांच्या सतेज

दुर्गा भागवत



**७ मे २०१२ हा दुर्गा भागवत यांचा दहावा स्मृतिदिन. त्यांच्यावर लघुपट करत असताना, लघुपटाच्या निर्मात्या व दिग्दर्शिका अंजली कीर्तने यांना त्यांचा सहवास लाभला. त्यातून त्यांना कविता स्फुरल्या. कवितेतून चित्रित झालं ते दुर्गाबाईंचं सहजसुंदर वृद्धत्व. त्या स्मृतिचित्रांचं हे आहे काव्यात्म चित्रण...**

मनाची निशाणी म्हणजे वृद्धत्वाच्या ऐन बहरात त्यांनी लिहिलेली नितांत सुंदर कविता : 'आयुष्याची झाली रात। मनी पेटे अंतर्ज्योत.' जिच्या मनात अंतर्ज्योत तेवते आहे, त्या व्यक्तीला मनोवार्धक्य येणं कसं शक्य आहे? आयुष्य चार भिंतीत बंदिस्त झालं आहे खरं; पण चैतन्यमय मनाची धाव रोखणं शरीराला शक्य नाही. दुर्गाबाईंचं एक वाक्य आठवलं, ''मी अधांतरीची चिरप्रवासिनी. भूमी माझे पाय कुठेही खिळवून ठेवीत नाही.''

माझी नजर दुर्गाबाईंच्या पावलांकडे गेली. मऊ गुलाबी सपातांमध्ये मुकाट बसलेले छोटेसे पाय. दुर्गाबाईंचे हातपाय लहानखुरे! हेच का ते पाय, ऐन तारुण्यात संस्कृतीच्या अभ्यासासाठी घराबाहेर पडलेले? मुक्त मनाचे भटके पाय! लोकगीतं, लोककथा, कशिद्यांचे नमुने, फुलपानं, फुलपाखरांचे विभ्रम पाहत दूरदूर हिंडून आलेल्या त्या स्त्रीचे जीवनोत्सुक पाय! नशीब शोधायला बाहेर पडलेली राजकन्या दुर्गा! तिला जन्मभर साथ देईल असं अमृतफळ सापडलं ते शब्दशक्तीच्या रूपानं. या शब्दप्रेमी स्त्रीचं अंतरंग लघुपटातून प्रकटावं म्हणून मी परत एकदा त्यांची पुस्तकं वाचली. डोळ्यांचा कॅमेरा करताच, त्यातली 'चित्रं' नव्यानं जाणवू लागली. दुर्गाबाईंनी माझ्या मनामध्येच घर केलं. वेळीअवेळी त्यांच्या हाका मला ऐकू येऊ लागल्या.

एक दिवस विलक्षण अनुभव आला. दुपारी लिहिता लिहिता, डेस्क बाजूला सारून सतरंजीवर जरा पडले. अर्धवट जागी, अर्धवट झोपलली! अशा स्थितीत अनुभव घेतला तो, कोंडलेपणाचा... घुसमटण्याचा... जागच्या जागी मरण पावण्याचा! माझ्या संवेदनांचं एकेक द्वारं जणू बंद होत होतं. कान, डोळे, नाक, ओठ, त्वचारंध्रं... सारं मिटलेलं! त्या विचित्र अवस्थेमध्ये मी उठून बसले. मन:प्रवाहात दुर्गाबाई होत्या. त्यांचं अस्तित्व प्रेरक होतं. कविता स्फुरत होती. गेले काही महिने गाढ निजलेल्या कवितेवर दुर्गाबाईंनी जादूचं पाणी शिंपडलं होतं. दगडी पुतळ्यात जीव आला. डोळे हलू-पाहू लागले. ओठांना गाणं सुचलं. अंगाला पालवी फुटली. दुर्गाबाई म्हणजे वृद्धत्वाचं मूर्तिमंत सुंदर रूप! त्यांना भेटणं, पाहणं, त्यांच्या नजरेला नजर देणं, त्यांना स्पर्श करणं, निरोप घेताना मागे वळून त्यांना

मनात साठवणं, हा साराच अनुभव प्रेरक! या अंतिम पर्वात दुर्गाबाई एकट्या असल्या तरी एकाकी नव्हत्या. स्व-सहवासात होत्या. मी साक्षी होते एका आत्मसंवादाची. चिंतनमग्न मनाच्या स्वगताची. दुर्गाबाईंच्या सहवासात माझ्या मनात कवितांचे मेघ दाटून आले. नंतर दीड-दोन वर्षं ते बरसतच राहिले. शिशिरातला बहर ऋतू मला कविता देऊन गेला.

**भूमिकन्या**

ज्या भूमीतून उगवले,
हिरवी कोवळी बनले,
फळाफुलांनी लगडले,
वाढता वाढता महावृक्ष झाले,
नव्वद पावसाळ्यांचा,
त्याच भूमीत मी आज पहुडलेय
विश्रब्ध भूमिकन्या बनून
भूमीत विलीन होऊन मृण्मयी बनायचा दिवस
हा उभा आहे... हाताच्या अंतरावर...!
माझी तयारी झाली आहे
ना निरोपाचे शब्द, ना उसासे ना आसू
जगाशी बोलता बोलता मी येऊन पोहोचले आहे
माझ्यापाशी!
मला हाकही मारावी लागणार नाही
'तो' उगवेल तेव्हा
मी नि... घा... ले... ली असेन...

दुर्गाबाईंबरोबर व्यतीत केलेले क्षण असेच कविता देऊन जात होते. चित्रीकरणापूर्वी एकदा दुर्गाबाईंच्या जीवनप्रीतीचा मोठा मनोज्ञ प्रत्यय मला आला. नेहमीप्रमाणे दुर्गाबाई वेणीफणी करून व्हीलचेअरवर बसल्या होत्या. जवळ त्यांची देखभाल करणाऱ्या सुशीलाबाई उभ्या होत्या. दुर्गाबाईंच्या केसात शोभेच्या अबोलीचं चिटुकलं हिरवंगार पान होतं. मी विचारलं, ''हे काय? केसात पान माळलंय?'' तेव्हा सुशीलाबाई म्हणाल्या, ''आमच्या दुर्गूताईंना फूल नसलं तर पानपण चालतं माळायला.'' वयाची नव्वदी ओलांडल्यावरही दुर्गाबाईंच्यातील फुलवेडी मुलगी मावळली नव्हती. ते सुंदर चित्रही कवितेत येऊन बसलं.



अंजली कीर्तने, दुर्गा भागवत आणि विक्रम गोखले

**परकरी पोर**

एक परकरी पोर वावरतेय तिच्या वृद्ध देहघरात
आजही
वेचायचेत तिला तांदुळमणी समुद्रकाठी
भातुकलीतल्या भातासाठी
माळायची आहेत फुलं केसांत
फुलं नसल्यास पानंही चालतात
आजारी खोलीचं अंगण होतं
फुगडीच्या लयीत घुमू लागतं
उडून जातात औषधी वास
मोहरून येतात चाफेगुलाब
चिंचाबोरांचे रुसवेफुगवे
शाळेच्या वाटेवर पाखरांचे थवे
परकरी पोर दुपारी दमते
आजीच्या कुशीत अलगद शिरते
सुरकुती बोळकं खुदूखुदू हसते
खोबऱ्याच्या वाटीतून बाळहसू सांडतं.

शैशव आणि वृद्धत्व एकाच देहात वावरताना मी दुर्गाबाईंच्या ठायी पाहिलं. त्या शेवटच्या दिवसांत मी त्यांची कितीतरी रूपं पाहिली. त्यांचं पुन:पुन्हा नवं होणं पाहिलं. वृद्धत्वातही शाबूत राहिलेल्या त्यांच्या 'चैत्रहृदया'नं मी मोहून गेले. त्यांच्याकडे पाहताना वाटे, आतल्या आत दुर्गाबाई अजूनही कात टाकत आहेत. इतकंच की लेखणीनं मौन धरल्यानं ते नवोन्मेष शब्दांतून प्रकट होऊ शकत नाहीत. मात्र त्यांच्या कात टाकण्याची एक खूण काही छायाचित्रांनी धरून ठेवली होती. दुर्गाबाईंच्या घरच्यांनी त्यांची नव्वदी साजरी केली होती. त्या दिवशी दुर्गाबाईंच्या अंगावर निळ्याभोर रंगाची गर्द रेशमी साडी होती. जुन्या असूनही त्या वस्त्रात दुर्गाबाई नव्याकोऱ्या वाटत होत्या. त्यांचं हास्य सांगत होतं की जीवनप्रीतीला ठसठसते कोंब फुटत आहेत. मनभर आनंद मोहरून आला आहे. अंतरंगात काहीतरी सुंदर घडतं आहे.

**जीवनोत्सुक**

नव्वद पावसाळ्यांची तिची वृद्ध उन्हाळी
काया
तडकलेल्या शुष्क, जलहीन भूमीसारखी
डोळ्यांत मात्र अजूनही लुकलुकताहेत
जाणिवांचे लखलखते तारे
जीवनोत्सुक मनाचे दोन झरोके
मधूनच ओठांवर उमलतं स्मितहास्य
स्फिंक्सच्या कोड्यासारखं गूढरम्य
कोणत्याही क्षणी ती उठेल तिच्या वृद्धत्वातून
कात टाकेल जीर्ण वस्त्रासारखी
त्या वृद्ध त्वचेमागे
एक कोवळा तजेलदार देह लपला असेल

शेवटच्या दिवसांत दुर्गाबाईंना स्मृतिभ्रंश झाला होता. स्मृती आणि

विस्मृतीच्या दोन तीरांमध्ये त्यांचं मन येरझारा घालत असे. कधी ते स्मृतींच्या बाजूला झुके. अगदी बालपणीच्या मैत्रिणी आठवत. मात्र ते विस्मृतीकडे झुकलं की घरची माणसंही अनोळखी वाटत. मन प्रकट करणारे शब्ददेखील हरवून जात. लघुपटासाठी मी दुर्गाबाईंची केवळ पुस्तकं वाचली नाहीत, त्यांचं मौन, नि:शब्द अवस्था, त्यांचा हरवलेपणाही वाचला. साहित्य वाचताना देखील दोन शब्दांच्या, वाक्यांच्या मधल्या रित्या जागा वाचायलाच लागतात. दुर्गाबाईंच्या बारीकसारीक कृती, हालचाली, तंद्री, स्मित हेच आता त्यांचे शब्द बनले होते. ते अबोल शब्दच मला कविता देऊन जात होते. नादशरीर त्यागलेले विदेही शब्द दुर्गाबाईंच्या मनातला भावकल्लोळ सांभाळून होते. दुर्गाबाईंच्या तरल मनाचं गूज मला सांगत होते.

**स्मृती–विस्मृती**

आवेगानं वाहणाऱ्या
विस्मृतींच्या प्रवाहाविरुद्ध पोहत
स्मृतींच्या मत्स्यकन्या येऊन बसत ऊन खात
तिच्या मनाच्या वृद्ध किनाऱ्यावर
त्यांच्या रत्ननेत्रांत तिनं बघितली
मुग्ध, यौवनमग्न, प्रगल्भ–सुंदर, सळसळती आत्मबिंबं...
विसर पडला तिला
भोवती साचत जाणाऱ्या पानगळीच्या जीर्ण वैभवाचा
हेही दिवस गेले...
सोबतीला येईनाशा झाल्या मत्स्यकन्या
गोठला अवतीभवती पांढराशुभ्र बधीर हिवाळा
मी कोण? कोठली?... मनात प्रश्नांची दाटी
बर्फाच्या आरशात तिनं पाहिलं तिचं बिंब
पाहिलं... नाकारलं... पुन्हा पाहिलं
डोळ्यांच्या काठांवर अश्रू तरारला
जीर्ण सुरकुत्यांच्या ओठांचं समंजस कमळ
हसून म्हणालं, ''स्वीकार स्वत:ला''

दुर्गाबाईंच्या अंतिम यात्रेत मी सामील झाले होते. ७ मे २००२ रोजी चंदनवाडी स्मशानभूमीत मी दुर्गाबाईंचा निरोप घेतला. माझा लघुपट अजून पूर्ण झाला नव्हता. मात्र दुर्गाबाईंच्या निधनापूर्वी त्यांचं चित्रीकरण पूर्ण झालं होतं. विक्रम गोखले, अहिल्या रांगणेकर, चारू भागवत, विश्वास पाटील, मोहन भागवत, पद्मजा फेणाणी ही सर्व मंडळी दुर्गाबाईंच्या चित्रीकरणात सहभागी झाली. त्या निमित्तानं अनेक चाहतेही त्यांना भेटून गेले. त्या अनुभवानं दुर्गाबाई ताज्यातवान्या झाल्या. आनंदी दिसू लागल्या; असं मला त्यांच्या घरच्या माणसांनीच सांगितलं.

लघुपटाचा शेवट कसा करायचा ते माझ्या मनात निश्चित होतं. टाऊन हॉलच्या उंच उंच चढत जाणाऱ्या पायऱ्या...वृद्ध दुर्गाबाईंचं काम करणाऱ्या शैलजा हर्डीकर संथपणे त्या पायऱ्या चढत जातात. मध्यभागी पोहोचल्यावर थांबतात. मागे वळून बघतात. शुभ्र शुभ्र हसतात. त्यांचा चेहरा विरून जातो. त्या जागी खऱ्या दुर्गाबाईंचा एक हसरा क्लोजअप दिसू लागतो आणि स्थिरावतो.


या शेवटच्या शॉटवर टाकायला मला असं काहीतरी हवं होतं ज्यातून दुर्गाबाईंचं व्यक्तिमत्त्व, त्यांचं अंतरंग आणि जीवनसार प्रकट होईल. मला गाणं नको होतं. दुर्गाबाईंच्या मनाचीच ज्याला लय असेल अशी कविता हवी होती. आतापर्यंत कवितेच्या वहीत दुर्गाबाईंवरील कवितांचं 'सुंदरबन' गच्च झालं होतं. मी कविता वाचू लागले. अनेक वाचल्या आणि सोडून दिल्या. शेवटी एक कविता गवसली. तिला पाहून माझ्या मनातील अस्वस्थतेची आग शमली. मनाचं शांतवन झालं. दुर्गाबाईंच्या दहाव्या स्मृतिदिनी मला प्रिय वाटणारी त्यांची छबी त्यांना अर्पण करत आहे.

**जाण्यापूर्वी**

जाण्यापूर्वी काही तरी देऊन जाईन
माझं मीपण या इथं ठेवून जाईन
माझ्या मागे येणाऱ्यांनो इतुकंच करा
पुस्तकाची जुनी पानं उलटून वाचा
निजलेला शब्दार्थ मनी जागा करा
उद्याच्या आकाशात मला मुक्त करा
भूमीमध्ये पेरते मी जादूच्या बिया
उगवत राहीन मी शब्द माझी काया

**– अंजली कीर्तने**
डी–४, माधवनगर सोसायटी
भवानी शंकर रोड, शारदाश्रम शाळेजवळ,
दादर, मुंबई ४०००२८
दूरध्वनी : (०२२) २४२२३६७६
anjalikirtane@gmail.com

**ग्रंथालीचे नवे प्रकाशन**




**साहित्य : आस्वाद आणि अनुभव**

**द.ता. भोसले**

डॉ. द.ता. भोसले यांनी वेगवेगळ्या निमित्ताने लिहिलेल्या समीक्षालेखांचा हा संग्रह आहे. तत्कालीन साहित्यिक पर्यावरण, त्या काळातील समाजमन; त्याची अभिरुची, साहित्य आणि समाज यांचा अनुबंध आणि विशिष्ट साहित्यकृतीमधील मर्मस्थळे यांचा परिचय यातून होतो. पहिल्या भागात त्याचा आढावा घेताना, दुसऱ्या भागात घेतलेला विविध साहित्यकृतींचा परामर्श, ग्रामीण जीवन आणि कृषिसंस्कृतीशी निगडित असल्याने, कृषीजीवन, ग्रामव्यवस्था आणि लोकमानस यांची अधिक चांगली ओळख होण्यास मदत होईल. या लेखनातील चिंतन अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# जय महाराष्ट्र!

## दिलीप चावरे

महाराष्ट्राबद्दल एक विनोद हल्ली औद्योगिक जगतात फिरत असतो. एका ग्राहकाने नवीकोरी गाडी घेतली आणि तिच्यातून फेरफटका मारण्यास निघाला. काही किलोमीटर अंतरानंतर गाडी बंद पडली. त्यामुळे त्याने विक्रेत्यास बोलावून घेतले. गाडीचे बॉनेट उघडता आतमध्ये इंजिन नसल्याचे दिसून आले. तरीही गाडी कशी चालली याबद्दल त्याने आश्चर्य व्यक्त केले. त्यावर विक्रेता उत्तरला, 'कंपनीच्या लौकिकावर.' महाराष्ट्राची परिस्थितीही काहीशी अशीच आहे. पूर्वपुण्याईमुळे अजूनही देशातील प्रमुख राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश होत असला तरीही एकूण प्रगतीचा मंदावणारा वेग चिंता निर्माण करणार ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांत राज्यात एकही मोठा प्रकल्प न येणे किंवा पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात इतर राज्यांच्या मानाने निराशाजनक ठरणारी कामगिरी, यामुळे महाराष्ट्राची घौडदौड पुनश्च कधी सुरू होणार अशी विचारणा औद्योगिक क्षेत्राकडून सतत होत असते.

लोकसंख्येच्या बाबतीत उत्तरप्रदेशा–नंतर क्रमांक असणारा महाराष्ट्र, क्षेत्रफळाच्या बाबतीत राजस्थान आणि मध्यप्रदेश यांच्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आहे. एकेकाळी देशातील एकंदर औद्योगिक उत्पादनापैकी जवळपास १५ टक्के वाटा महाराष्ट्राचा असे. मात्र हे चित्र आता बदलले आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि ओरिसा ही राज्ये महाराष्ट्राशी स्पर्धा करू लागली आहेत. गुजरातने तर महाराष्ट्रावर यापूर्वीच आघाडी मिळवलेली आहे. तरीही महाराष्ट्राचे स्थान काही प्रमाणात टिकून असल्याचे श्रेय पूर्वसुरींनाच द्यावे लागेल. राज्यात वीज आणि रस्ते या क्षेत्रांचा विकास करण्यावर जोपर्यंत महाराष्ट्राने लक्ष दिले तोपर्यंत त्याची आघाडी कायम राहिली. सुमारे पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्र आपली अतिरिक्त वीज परराज्यांना विकत असे. परंतु एन्रॉन प्रकल्पाभोवती झालेल्या राजकारणामुळे वीज क्षेत्राचा खेळखंडोबा झाला. माधव गोडबोले यांच्यासारख्या स्वयंघोषित तज्ज्ञांच्या सल्ल्याचा वापर करून एन्रॉन प्रकल्पास टाळे लावण्यात आले. नंतर ते उघडण्यासाठी महाराष्ट्रालाच केंद्राची मनधरणी करावी लागली. त्यासाठी शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांना कोणाकोणाचे उंबरे झिजवावे लागले याचे वर्णन त्यांच्याकडूनच ऐकण्यासारखे आहे. मात्र जे तथाकथित समाजधुरीण एन्रॉन प्रकल्पाविरुद्ध कंठशोष करत होते ते नंतर गायब झाले. दरम्यान, महाराष्ट्राची अपरिमित हानी झालेली होती. वीज नसल्यामुळे औद्योगिक गुंतवणूक अन्य राज्यांकडे जाऊ लागली. नवीन कारखानदारी येत नसल्यामुळे रोजगारनिर्मितीत खंड पडला आणि एकूणच निराशेचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम औद्योगिक आणि सामाजिक असमतोल निर्माण होण्यात झाला. राजकीय अस्थिरता आणि सत्ताधारी आघाडीमधील शह–काटशहाच्या कारवायांमुळे कोणत्याच महत्त्वाच्या विषयावर निर्णय होऊ शकत नव्हता. घोंगडे भिजत ठेवण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवडी न्हावाशेवा हा प्रस्तावित समुद्रसेतू. आरंभी चार हजार कोटी रुपयांच्या आसपास खर्चाचा अंदाज असणारा हा प्रकल्प आता नऊ हजार कोटी रुपयांच्या घरात गेला आहे. अजून त्याचा नारळ फुटायचाच आहे. मुंबईत अंधेरी–घाटकोपर मेट्रो रेल्वेचे काम संथ गतीने चालू आहे. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००६ साली प्रकल्पाची पायाभरणी केली तेव्हा त्याच्या पूर्ततेस २००८ अखेरीचा वायदा करण्यात आला होता. त्याला सतत मुदतवाढ मिळत चालली आहे. मे २०१२ मध्ये प्रकल्प पूर्ण होईल अशा घोषणा मुख्यमंत्र्यांसह अनेकांनी केल्या. त्या हवेत विरून गेल्या. प्रकल्पपूर्तीची तारीख आजही सांगणे अशक्य आहे. या साऱ्या दिरंगाईत राज्य शासनाचा बडगा कोठेही दिसलेला नाही. जवळपास प्रत्येक कामाच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे.

यंदाचा दुष्काळ अत्यंत गंभीर आहे. त्याबद्दलची चर्चा जानेवारीतच सुरू झाली होती. मात्र विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंत प्रत्यक्ष कार्यवाही शून्य! आता जनावरांच्या छावण्या आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकर आदींबाबत धावपळ चालू झाली आहे. हा हा म्हणता पावसाळा येईल आणि आधीचे सगळे निर्णय वाहून जातील. गेल्या ४० वर्षांत दुष्काळ निवारण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या, त्यांचे अहवाल शासनाला सादर करण्यात आले. ते उघडून पाहण्याची तसदी कोणी घेतली असेल

काय याबद्दल शंका घेण्याचीही गरज नाही. कारण प्रत्यक्षात काही काम झालेले नाही. याउलट इतर राज्यांमधील परिस्थिती आहे.

एकेकाळी महाराष्ट्राचे वर्णन कार्यकर्त्यांचे मोहोळ अशा शब्दांत महात्मा गांधींनी केले होते. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके, भारतात पहिला चलत्‌चित्र कॅमेरा बनवणारे बाबुराव पेंटर, शेतीची अवजारे आणि ऑईल इंजिने बनवणारे लक्ष्मणराव किर्लोस्कर, भूदानाची दीक्षा देशाला देणारे आचार्य विनोबा भावे, आपल्या लेखणीने जनतेला रस्त्यावर उतरवणारे आचार्य अत्रे किंवा बेळगावच्या लढ्यासाठी जनजागृती करणारे सेनापती बापट, आदी महापुरुषांच्या उपक्रमशीलतेला आजही वंदन करावेसे वाटते. तत्पूर्वी, स्वातंत्र्याच्या लढ्यात आघाडीवर असणारे तीन प्रांत म्हणजे मुंबई, बंगाल आणि पंजाब. त्याच काळात मराठी सर्जनशीलतेला आलेला बहर विस्मयकारक होता. पुण्याच्या प्रभात फिल्म कंपनीने मराठीचा लौकिक सातासमुद्रापलीकडे नेलेला होता. व्ही.शांताराम मुंबईला आल्यावर थोड्याच काळात राजकमल चित्रमंदिर उभारू शकले ते केवळ आत्मविश्वासाच्या जोरावर. अत्यंत सामान्य कुटुंबात जन्माला आलेले आबासाहेब गरवारे केवळ धडाडीच्या जोरावर देशातील नामवंत उद्योगपती म्हणून प्रसिद्ध झाले. ज्यांच्या घरात शिक्षणाची परंपरा नव्हती असे यशवंतराव चव्हाण केंद्रात उपपंतप्रधान पदापर्यंत पोहचले. रघुनाथ माशेलकरांसारखा, आईने काबाडकष्ट केल्यामुळे शिकू शकलेला मुलगा जागतिक कीर्तीचा शास्त्रज्ञ झाला. भारताला अणुक्षेत्रात खड्‌गधारी बनवणारा अनिल काकोडकर यांच्यासारखा मेधावी शास्त्रज्ञ या महाराष्ट्रातच निर्माण झाला. उपेक्षितांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणारे कर्मवीर भाऊराव पाटील या मराठी मातीतच जन्माला आले. औपचारिक शिक्षण नसतानाही वसंतदादा पाटील या महाराष्ट्रात चार वेळा मुख्यमंत्री झाले. या सर्वांना ध्यास होता महाराष्ट्राच्या प्रगतीचा. यशवंतराव गेल्यानंतर त्यांनी मागे ठेवलेली संपत्ती होती त्यांची पुस्तके. बौद्धिक संपदेच्या आणि उपक्रमशीलतेच्या सामर्थ्यावर देशात अव्वल क्रमांकावर अनेक वर्षे राहिलेल्या महाराष्ट्राची अशी अवस्था का व्हावी? महाराष्ट्रातील उपक्रमशीलता संपली आहे काय? राज्यातील वातावरण प्रगतीला बाधक ठरू लागले आहे काय? एक ना अनेक प्रश्न आहेत. परंतु त्यांची उत्तरे देण्याची क्षमता असणारे नेतृत्त्व मात्र पुढे येत नाही.


वास्तविक, महाराष्ट्रामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. कारखानदारीचा विस्तार मर्यादित भूभागात असला तरीही प्रचंड आहे. केवळ बंद पडलेले कारखाने पुन्हा चालू झाले तरीही महाराष्ट्र इतरांना मागे टाकेल अशी परिस्थिती आहे. पण लक्षात कोण घेतो?

आज गरज आहे महाराष्ट्राच्या कामगिरीचा कठोर आढावा घेण्याची. किती अपूर्ण प्रकल्प लवकर पूर्ण करता येतील आणि त्यासाठी किती निधीची गरज लागेल याचा लेखाजोखा शासनाने जाहीर करून त्यानुसार कार्यवाही सुरू करणे ही तातडीची गरज आहे. लोकानुनय करण्यासाठी नव्या प्रकल्पांच्या घोषणा करणे आता थांबले पाहिजे. त्याचप्रमाणे रस्त्यांचे जाळे, बारमाही सार्वत्रिक पेयजल उपलब्धता आणि विजेचा पुरवठा या मुद्यांना प्राधान्य मिळाले तर अनेक प्रश्न आपोआप नाहीसे होतील. आम्हाला सवलती नको, पाणी द्या असा टाहो शेतकरी अनेक वर्षे फोडत आहे. मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्ष झाले आहे. त्याचप्रमाणे, शिक्षण असो की वैद्यकीय व्यवसाय, महाराष्ट्रात बहुतेक क्षेत्रांत अनागोंदी माजलेली दिसते. यावरील शासकीय यंत्रणेचा वचक नाहीसा झाल्यासारखे वाटते. ही परिस्थिती जेव्हा बदलेल तेव्हाच महाराष्ट्राचे पाऊल पुढे पडू लागेल.

**– दिलीप चावरे**

patrakar@hotmail.com


**यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी आरंभी प्रसिद्ध झालेले पुस्तक**




**यशवंतराव चव्हाण**

माणूस आणि लेखक

**डॉ. प्रकाश दुकळे**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, कृषि-औद्योगिक क्रांतीचे प्रणेते अशा विविध पैलूंनी समृद्ध असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंतराव चव्हाण यांना ओळखले जाते.

मात्र, 'यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक' या ग्रंथात, डॉ. प्रकाश दुकळे यांनी, यशवंतरावांच्या अभिरुचीसंपन्न सर्जकतेचा धांडोळा घेताना, त्यांच्या उपलब्ध वाङ्मयकृती आणि प्रकाशित-अप्रकाशित पत्रसंग्रह यांच्या आधारे यशवंतरावांची बहुश्रुत रसिकता, सर्जनशीलता आणि एकूणच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेतला आहे.

यशवंतरावांमधील कर्तव्यकठोर तरी हळव्या 'माणूस'पणाच्या हृद्य पैलूवरही डॉ. दुकळे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. एकूणच यशवंतरावांच्या अष्टावधानी व्यक्तिमत्त्वाची जाणीव हा ग्रंथ वाचताना होईल...

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

थिंक महाराष्ट्र डॉट कॉम

थिंक महाराष्ट्र, लिंक महाराष्ट्र

**महाराष्ट्रातील कर्तृत्व, गुणवत्ता व चांगुलपणा व्यक्त करावी म्हणून www.thinkmaharashtra.com या वेबपोर्टलतर्फे जिल्ह्या-जिल्ह्यातून माहिती संकलित केली जाते. तसे दोन लेख येथे प्रसिद्ध करत आहोत. संपर्क thinkm2010@gmail.com फोन नंबर (०२२) २४१८३७१०**

# रायगड-राजगड यांच्या तीनशे फेऱ्यांतील संशोधन!

**ज्योती शेट्ये**

मिलिंद पराडकर यांच्या पुस्तकाचे जुलैमधील गिरिमित्र संमेलनात (२०११) प्रकाशन झाले, तो क्षण त्यांच्यासाठी स्वप्नपूर्तीचा होता! ते स्वप्न त्यांच्या आईने पाहिले होते. मिलिंदने गडदुर्गांचा जो अभ्यास केला तो पुस्तकरूपाने यावा असे तिला वाटे. तो क्षण आला पण तोवर ती मात्र राहिली नव्हती! आईला तसे वाटणे हे स्वाभाविक होते, कारण मिलिंदच्या वेडाचे, छंदाचे रूपांतर तिच्याच समोर अभ्यासात होत गेलेले तिने पाहिले होते. मिलिंदला त्याच्या या अभ्यासामधून पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यासाठी त्याने काही वर्षे अपार मेहनत घेतली. मिलिंद सांगत होते, 'या अभ्यासा-दरम्यान काही अभूतपूर्व माहिती माझ्या हाती आली. रायगडावरील इमारती लांबीरुंदीचे जे प्रमाण योजून रचल्या गेल्या ते सूत्र मला गवसले. ते मी साधार अन् सचित्र असे प्रबंधात मांडले आहे.'

'प्राचीन भारतीय दुर्गशास्त्र आणि हिंदवी स्वराज्याच्या दोन राजधान्या- राजगड व रायगड : एक तुलनात्मक अभ्यास' हा त्यांचा प्रबंधविषय. मिलिंद यांचा प्रबंध फेब्रुवारी २००८ ते मार्च २०१० ह्या काळात लिहून पूर्ण झाला. त्याचे पुस्तकरूपातील प्रकाशन संमेलनात झाले. सर्वच गिर्यारोहकांच्या दृष्टीने



**मिलिंद पराडकर**

**मिलिंद पराडकर यांना गिरिभ्रमंतीचे वेड. त्यांनी त्या वेडाला विधायक वळण दिले आणि त्यामधून त्यांना किल्ल्यांच्या अभ्यासाची दिशा मिळाली. त्यांनी राजगड आणि रायगड या महत्त्वाच्या दोन किल्ल्यांवर जवळजवळ तीनशे फेऱ्या मारून काही नवी माहिती हस्तगत केली. त्यामधून त्यांना पीएच.डी.देखील मिळाली. पण त्यामुळे त्यांच्या अभ्यासाची पूर्तता झालेली नाही. ते एका बाजूला पाचशे गडांची वेबसाईट बनवत आहेत, तर दुसऱ्या बाजूला एशियाटिक सोसायटीसाठी महाड ते चेन्नई इथपर्यंच्या गडांच्या रांगेचा अभ्यास करत आहेत.**

तो अभिमानाचा क्षण होता. गिरिभ्रमणाचे वेड गेल्या दोन-तीन दशकांमध्ये खूप वाढत गेले आहे. परंतु ते छंदाच्या, हौशीच्या किंवा फारतर सामाजिक कार्याच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटत आले आहे. त्या विषयाचा अभ्यास फार थोड्या लोकांनी केला.

मिलिंदना १९७८ सालापासून पदभ्रमण आणि गिर्यारोहण हे वेड लागले. त्यांना ज्येष्ठ साहित्यिक आणि दुर्गप्रेमी गो.नी. दांडेकर ह्यांच्या सहवासात, गड-किल्ल्यांत फिरणे म्हणजे केवळ मजा नव्हे तर तो अभ्यासाचा विषय आहे ह्याचे भान आले. त्यामुळे त्यांना गडांचा ऐतिहासिक ऐवज, गडांवर घडलेल्या घटना यांची जाण आली आणि तीच ओढ त्यांना एका वेगळ्या विश्वात घेऊन गेली.

एका मित्राने त्यांना १९८८ साली 'दुर्गांच्या वाटा भटकणे' ह्या विषयाचा गंभीरपणे विचार करून, त्यांवर पीएच.डी. करावी असे सुचवले. त्यातून त्यांचे भटकणे जास्त डोळस झाले. शिवछत्रपती हे त्यांचे दैवत. राजगड आणि रायगड या शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याच्या दोन राजधान्या. एक अभिषिक्त तर दुसरी अनभिषिक्त. शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील सर्व घटना त्या दोन दुर्गांनी पाहिल्या आहेत. मिलिंदना ते दुर्ग भटकताना राजांच्या कर्तृत्वाचा अस्सल प्रत्यय येत गेला. त्यांचे मन प्रत्येक नवीन आकलनाबरोबर भारावून जाई. अभ्यासाच्या दरम्यान त्यांचे इतर दुर्गतर भटकून झालेच; पण त्यांच्या राजगड आणि रायगड या दोन्ही दुर्गांच्या प्रत्येकी जवळपास तीनेकशे वाऱ्यात घडल्या.



**मिलिंद पराडकर गडांवर माणसांचा ग्रूप घेऊन जातात व त्यांना गड-किल्ले समजावून देतात. या लेखात छायाचित्रे आहेत, ती त्यांच्या अशाच एका मोहिमेची.**

मिलिंद सांगत होते, प्रत्येक वारीत नवीन विचार मिळत होता; नवीन माहितीचा खजिना नवीन रंगात समोर येत होता. त्याचा सतत विचार करणे, ते विचार तर्कसंगत मनात मांडणे आणि नंतर कागदावर उतरवणे, ते तपासण्यासाठी मार्गदर्शक सर अरविंद जामखेडकर ह्यांच्याकडे देणे, त्यांनी ते वाचून-तपासून पाठवणे ह्या प्रक्रियेत दीड वर्ष स्वप्नवत गेले आणि प्रबंध आकाराला आला.

काही महत्त्वाचे निष्कर्ष त्यांच्या हाती लागले आहेत. त्यांना दुर्गांचा रचनाकाल शास्त्रीय पुराव्यानिशी सातवाहनांपर्यंत, म्हणजे जवळजवळ पाचशे वर्षे मागे ढकलण्यात यश लाभले आहे. आपल्या ह्या यशात त्यांचे कुटुंबीय, गुरुवर्य गोनीदां आणि डॉ. अरविंद जामखेडकर व समग्र मित्रमंडळ यांचा मोठा वाटा आहे असे ते म्हणतात. त्यांचा मित्रपरिवार मोठा आहे आणि ते सगळ्यांचे लाडके आहेत. गड-किल्ल्यांवरचे त्यांचे भाष्य ऐकताना सगळे भारावून जातात.

लहानपणापासून मुंबईत वास्तव्य असणारे आणि सर्व शिक्षणही मुंबईतच झालेले मिलिंद वयाच्या सोळाव्या वर्षापासून नोकरी करू लागले. त्यांनी पदवी मिळवली (१९८०). त्यांनी १९८१ ते १९९५ ह्या काळात 'लार्सन ॲण्ड टुब्रो'मध्ये नोकरी केली. त्यांनी नोकरी करत असतानाच प्राचीन भारतीय संस्कृती हा विषय घेऊन एम.ए.ची पदवी मिळवली (१९९०). त्यांनी एलॲण्डटीची नोकरी १९९५ मध्ये सोडली, स्वत:चा चौदा वर्षे ग्राफिक डिझानयर म्हणून व्यवसाय केला. तेथे त्यांच्या कॉम्प्युटर आणि ग्राफिक सॉफ्टवेअरच्या ज्ञानाचा उपयोग झाला. ते मुलांसाठी आणि इतरेजनांसाठी ऐतिहासिक किल्ल्यांच्या भेटींचे आयोजन १९९८पासून करत आहेत. ते कॉर्पोरेट क्षेत्रातल्या लोकांसाठीही प्रोग्रॅम आखतात व कार्यान्वित करतात. 'होरायझन' ही त्यांची संस्था.

त्यांनी आता एक नवीन आव्हान स्वीकारले आहे. त्यांना एशियाटिक सोसायटी ऑफ इंडियाची स्कॉलरशिप मिळाली आहे. ते गडकिल्ल्यांचा कालक्रमानुसार अभ्यास करत आहेत (Chronology). त्यांना साल्हेर ते जिंजा ह्या किल्ल्यांचा अभ्यास करायचा आहे. तो महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, आंध्र आणि तामिळनाडू ह्या पाच राज्यांचा परिसर आहे. ते टिमवर्क आहे आणि मिलिंद यांच्या नेतृत्वाखाली काम चालले आहे. मॅजेस्टिक प्रकाशनाने त्यांच्या दोन ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांनी दैनिके आणि मासिके यांमधून बरेच लिखाण केले आहे. सह्याद्रीच्या भटकंतीवर रिचर्ड भाख यांच्या 'जोनाथन लिव्हिंगस्टोन सीगल' ह्या कांदबरीचे त्यांनी केलेले भाषांतर प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे. त्यांनी तुळसीदासाच्या 'रामचरितमानस'चे मराठीत गद्य-रूपांतर केले आहे. त्यांनी समर्थ रामदासांच्या 'रामायणा'चाही गद्यात अनुवाद केला आहे.

रायगड आणि राजगडावरच्या प्रबंध-ग्रंथामध्ये समाविष्ट असलेली, त्या ग्रंथाच्या आकर्षणाचा भाग असलेली सुंदर, आकर्षक छायाचित्रेही त्यांनी स्वत: काढलेली आहेत. त्यातून त्यांच्या छायाचित्रण-कौशल्याच्या पैलूचे उत्तम दर्शन घडते. त्यांच्या किल्ल्यांवर आधारित फोटोंची चार प्रदर्शने मुंबई आणि पुण्यात भरवण्यात आली होती. त्यांनी महाराष्ट्रातल्या सर्व किल्ल्यांची वेबसाईट डिझाईन केली आहे, पण ती अपडेट करायला त्यांना गिरिप्रेमींचे सहाय्य हवे आहे. त्यांनी तसे आवाहन केले आहे. कोणत्याही किल्ल्याच्या नवीन निरीक्षणाचे, माहितीचे तेथे स्वागत होईल असा त्यांचा संदेश आहे.

गडकिल्ले भटकता भटकता संशोधनाच्या वाटेवर वळलेल्या, ऐतिहासिक दृष्टिकोनातून किल्ले पाहणाऱ्या, स्वत: त्यात रमून आणि इतरांना रमवून टाकणाऱ्या मिलिंद यांची इच्छा आहे की त्यांच्या ग्रंथाच्या वाचनाने सर्वसामान्यांच्या मनातही महाराष्ट्र देशी पसरलेल्या दुर्गाविषयी आपलेपणा वाढावा.

**- ज्योती शेट्ये**

भ्रमणध्वनी : ९८२०७३७३०१
jyotishalaka@gmail.com

संपर्क : मिलिंद पराडकर
जी/७०६, हाय ब्लिस,
धायरी-नाहे रस्ता, धायरी,
ता. हवेली, पुणे ४११०४१
भ्रमणध्वनी : ९६१९०९६३४७
discover.horizon@gmail.com

## सांस्कृतिक ठेवा

# कचारगडची प्रागैतिहासिक गुहा

### मनोहर नरांजे

प्रागैतिहासिक मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे त्याची दगडी हत्यारे व निवासस्थळे यांच्या स्वरूपात प्राप्त झालेले आहेत. विदर्भात वर्धा-वैनगंगा नद्यांच्या खोऱ्यांतूनही तसे ते मिळाले आहेत. चंद्रपूर शहरालगतची 'पापामियां की टेकडी' व गोंदिया जिल्ह्यातील कचारगडची प्रागैतिहासिक गुहा ही त्यांपैकी प्रमुख स्थळे होती.

महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवर स्थित असलेला गोंदिया हा नवनिर्मित जिल्हा वनाच्छादित आहे. तेथील नागझिरा अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, इटियाडोह धरण यांसारखी स्थळे पर्यटकांस परिचयाची आहेत. त्या स्थळांच्या जोडीला निधडच्या छातीच्या साहसी निसर्गप्रेमी पर्यटकांना आव्हान देईल असे स्थळ म्हणजे दरेकसा गावालगतची कचारगडची प्रागैतिहासिक गुहा होय.


कचारगड हे स्थळ मुंबई-कोलकाता रेल्वेमार्गावर दरेकसा या छोट्या रेल्वे स्टेशनच्या लगत घनदाट अरण्यात आहे. दरेकसा स्थानकावर केवळ पॅसेंजर गाड्या थांबतात. बसमार्गाने गोंदिया सालेकसा या स्थळाहून तेथे पोचता येते. छत्तीसगड राज्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ डोंगरगड हेसुद्धा तेथून जवळच आहे.

सालेकसा-दरेकसाचा परिसर घनदाट अरण्य व वेळूची वने यांसाठी प्रसिद्ध आहे. त्या प्रदेशातून आगगाडीने जाताना वेगळीच अनुभूती लाभते. दरेकसानजीकच्या हाजरा फॉल या प्रसिद्ध धबधब्याच्या जवळ असलेल्या बोगद्यास पार करून आगगाडी दरेकसा स्टेशनवर थांबते. आगगाडीतून उतरताच प्रथमदर्शनी जाणवणारी गोष्ट म्हणजे सशस्त्र जवानांची व्यापक उपस्थिती. प्रदेश नक्षलग्रस्त असल्यामुळे एस.आर.पी.ची गस्त हा तिथला नित्याचा प्रकार आहे. परंतु बाहेरून येणाऱ्या पर्यटकांस त्यामुळे नक्षलग्रस्त प्रदेशाची प्रकर्षाने जाणीव होते. गाव पार करून कचारगडच्या गुहेकडे जाताना पोलिस ठाण्याच्या संरक्षणार्थ बंदुकीच्या नळ्या ताणून सशस्त्र उभे असलेले जवान पाहून ती भावना आणखी गडद होते.

> गोंदिया जिल्ह्यातील कचारगडच्या गुहेत प्रागैतिहासिक मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे मिळाले आहेत. ही गुहा गोंड समाजाच्या आराध्य दैवताचे स्थान समजली जाते. महाराष्ट्रातील ज्ञात अशा सर्व नैसर्गिक गुहांमध्ये आकाराने सर्वात मोठी गुहा येथेच असून तिची निर्मिती एकाच दगडात झाली आहे.

कचारगडच्या गुहेत जाणे हे सामान्य कुवतीच्या माणसाचे काम नव्हे. दरेकसा-पासून कचारगड असे मार्गक्रमण करताना त्याचा प्रत्यय वारंवार येतो. दरेकसालगतच्या धनेगाव या वनग्रामापासून कचारगडच्या गुहेकडे मार्ग जातो. नवख्या पर्यटकाने जाणकार वाटाड्या गावातून घेणे उत्तम. धनेगाव गावापासून अंदाजे तीन किलोमीटर अंतरावर उत्तरेकडे पहाडीत गुंफा आहे. डोंगर चढत-उतरत, जंगल तुडवत त्या स्थळी जाऊन पोचताच स्वागतासाठी उभी असतात ती मधमाश्यांची घरकुले व त्याभोवती घोंगावणाऱ्या माश्या. गुहेच्या दाराचे व त्यावर लटकणाऱ्या पोळ्यांचे दुरूनच दर्शन होते.

गुहासमूह मैकल पर्वतश्रेणीमध्ये यू आकाराच्या दरीत पश्चिम-दक्षिण असा



मुख्यु गुहेचे भव्य प्रवेशद्वार



गुहेतील आतील भाग

पसरलेला आहे. समुहात चार नैसर्गिक शैलाश्रये आहेत. पर्वताच्या पायथ्याशी वाहणाऱ्या दोन पावसाळी प्रवाहांपासून गुहा पाचशेअठरा मीटर उंचीवर असून गुहांचा पृष्ठभाग राखेच्या अवशेषांनी भरलेला आहे.

गुहासमुहातील सर्वात मोठी गुहा ही उत्तर-दक्षिण अठ्ठावन मीटर लांब व सत्तावन मीटर रुंद आहे. तिचे छत अतिशय उंचावर आहे. ती पर्वताच्या पोटात नैसर्गिक रीत्या एकाच खडकात तयार झालेली आहे. गुहा पश्चिमाभिमुख असून तिचे प्रवेशद्वार पंचवीस मीटर इतके रुंद आहे, तर तिच्या कमानीची (आर्च) सरासरी उंची चौऱ्याण्णव मीटर इतकी आहे. महाराष्ट्रातील ज्ञात अशा सर्व नैसर्गिक गुहांमध्ये आकाराने सर्वात मोठी अशीच ती गुहा आहे.

गुहेच्या छताच्या आग्नेयेस छताच्या कोपऱ्याशी मोठे छिद्र आरपार गेले आहे. त्यातून आकाशदर्शन होते. त्यामुळे गुहेमध्ये दिवसभर भरपूर प्रकाश खेळत राहतो. पश्चिमेच्या दारातून दुपारनंतर भरपूर सूर्यप्रकाश आत येतो. त्यामुळे गुहेत सुलभतेने वावरता



गुहा क्रमांक २ मधून दिसणारे बाह्यदृश्य

येते. गुहेच्या दक्षिण कोपऱ्यात नैसर्गिक झरा असून त्याचे पाणी पिण्यास योग्य आहे. गुहेमध्ये नैऋत्येस व उत्तर बाजूस कमीत कमी तीन खोल कोनाडे (विवर) आहेत. त्या ठिकाणी जायचे झाल्यास मात्र टॉर्चची गरज भासते. कोनाडे खोल असून आत निमुळते होत गेलेले आहेत. गुहेमधील पूर्व व उत्तर बाजूंचा बहुतेक पृष्ठभाग हा राखेच्या निक्षेपाने व्याप्त असून पावसाळ्यात छताच्या छिद्रातून पडणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे गुहेच्या पृष्ठभागावरील काही राख व अवशेष वाहून गेलेले आहेत, तथापी बरेच क्षेत्र मानवी हस्तक्षेपापासून अबाधित राहिलेले आहे. त्या ठिकाणच्या राखेच्या थरात पूर्वपुरातन काळातील दगडी अवजारे व इतर पुरावशेष आढळतात.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या प्रागैतिहासिक शाखेने (नागपूर कार्यालय) ऑक्टोबर १९८२मध्ये त्या ठिकाणी चाचणी-उत्खनन केले होते. उत्खननात गुहेच्या मध्यभागी मानवी वसाहतीशी निर्देशक असे सहा पृष्ठभाग प्राप्त झाले. त्यातून मध्यपाषाण काळापासून तर नवाष्म युगापर्यंतची विविध हत्यारे, नवपाषाण काळाशी निर्देशक मृदभांडी, त्याचप्रमाणे महापाषाण संस्कृतीची निदर्शक अशी कृष्णलोहित मृदभांडीसुद्धा प्राप्त झाली. उत्खननकर्त्यांच्या मते, नैसर्गिक गुहेमध्ये प्राप्त मानवी अवशेषातून मध्याश्मयुगातील अवजारे व मृदभांडी गुहेमधून प्राप्त होणे हा पुरावा संपूर्ण भारतात आश्चर्यकारक असा आहे. कारण त्यापूर्वीची नवाश्मयुगाशी संबंधित सर्व वसाहतस्थळे ही मोकळ्या व सपाट जागेत होती. कचारगड येथून प्राप्त पुरावशेष नवाश्मग्युगातही या प्रकारच्या नैसर्गिक गुहांमध्ये मानवी वसाहत होती या बाबीकडे आपले लक्ष वेधतात.

साधारणपणे पाचशे माणसे आरामात उभी राहू शकतील अशी ही गुहा प्रकाश व पाणी यांनी समृद्ध आहे. त्याशिवाय वारा, पाऊस, ऊन यांपासून नैसर्गिक रीत्या तिथे संरक्षण प्राप्त आहे. त्यामुळे अश्मयुगीन मानवाने आपल्या निवासासाठी त्या स्थळाचा उपयोग करणे अत्यंत स्वाभाविक होते.

कचारगड येथील इतर तीन गुहा लहान आहेत. तथापी त्यांचा पृष्ठभागसुद्धा राखेच्या निक्षेपांनी युक्त आहे. त्यापैकी मुख्य गुहेच्या वायव्येस दोन व पूर्वेस एक गुहा आहे.

वर्तमानात ते स्थानिक गोंड लोकांचे धार्मिक स्थळ आहे. त्यांच्या विश्वासानुसार गुहा म्हणजे त्यांच्या देवांचे निवासस्थान असून त्यांच्या पूर्वजांची अवजारे त्या गुहेत पुरलेली आहेत. या पारंपरिक समजुतीमागे पुरातत्त्वीय वस्तुनिष्ठता दडलेली आहे, हे सत्य नाकारता येत नाही. प्रस्तुत संदर्भात रेव्हरंड हिप्लॉप यांनी एका सुपरिचित गोंडी लोकगीतातून नोंदवलेली स्थानिक आख्यायिका विशद करणे महत्त्वाचे ठरावे.

स्थानिक भाषेत या स्थळास काचगड अथवा कचारगड असे म्हणतात. काचगड या शब्दाचा अर्थ लोहगड असा होतो. काच या गोंडी भाषेतील शब्दाचा अर्थ लोखंड असा आहे. लोकगीतातील उल्लेखानुसार महादेव म्हणतो, की लाल टेकडीच्या गुहेमध्ये (काचीकोपा) गोंड लोक बंदिस्त करून ठेवले व त्यावर विशाल प्रस्तर लावून गुहेचे तोंड बंद केले, तेव्हा आदिवासींचा नायक लिंगो याने तो प्रस्तर बाजूला ढकलून सोळा जमातींच्या आदिवासींना मुक्त केले. ते सर्व आदिवासींचे पूर्वज होते. ही आख्यायिका कचारगड या स्थळाविषयी असणे संभवनीय आहे. स्थानिक आदिवासींच्या मनात स्थळाविषयी श्रद्धा व आदर दिसून येतो. त्या ठिकाणी फेब्रुवारी महिन्यात मोठी यात्रासुद्धा भरते.

**– मनोहर नरांजे**
बहादुराफाटा, उमरेड रोड, नागपूर
भ्रमणध्वनी : ९७६७२१९२९६

### अ‍ॅड. ज्ञानदेव परशुरामकर


# झाडीपट्टी रंगभूमीचे लेणे

**प्राचार्य मदन धनकर**

ज्ञानदेव उद्धवराव परशुरामकर हे वकील आहेत. ते पदवीधर झाले. आयुक्त पातळीवरील लेखी परीक्षा व मुलाखत देऊन, नायब तहसीलदार म्हणून त्यांची निवड झाली. महसूल खात्यात रुजू न होता एम.ए.एलएल.बी. पदव्या त्यांनी घेतल्या. देखणे व्यक्तिमत्त्व आणि उत्तम वादक असल्यामुळे ते झाडीपट्टी रंगभूमीवर नट, दिग्दर्शक, वादक व संगीत संयोजक म्हणून सर्वदूर प्रेक्षकप्रिय झाले. शैक्षणिक पात्रता आणि रंगभूमीने दिलेली लोकप्रियता यांच्या बळावर चक्क जिल्हा परिषद सदस्य म्हणून निर्वाचित झाले. त्यामुळे जिल्ह्यातील सांस्कृतिक क्षेत्रातही मानमान्यता मिळाली.

गडचिरोली जिल्ह्यात एकमेव रेल्वेस्थानक व पहिली नगरपालिका देसाईगंज (वडसा) येथून, कुरखेडा मार्गावर ६ किलोमीटरवर असलेल्या विसोरा येथील ते रहिवासी. पाच हजार लोकवस्तीचे झाडीपट्टीतील गाव. संपन्न शेती व श्रीमंत संगीत रंगभूमी यांनी नावाजलेले. एकाच गावात शंभर ट्रॅक्टर अन् तेवढ्याच मोटार सायकली. शेती व ठेकेदारीसाठी धावणारे ट्रॅक्टर आणि मोटार सायकलवर स्वार होऊन रात्ररात्र रंगमंचाकडे पळणाऱ्या मोटार सायकली. उपजीविकेसाठी शेती आणि मनोधारणेसाठी नाटके. शेताच्या बांध्यावर राबणारा शेतकरी, रात्रौ नाट्यगृहात रंगून जाणारा प्रेक्षक अशी स्थिती.

ज्ञानदेव परशुरामकर यांच्या घरात प्रवेश केला की झाडीपट्टीतील आतिथ्याच्या सोबत तीन कॅसियो दिसतील. देशी स्वरांची



एक हातपेटी, फ्रेंच पायपेटी, जर्मन ऑर्गन, तबले-डग्गे आणि मेड इन जर्मनी-झेकोस्लाव्हाकियाची दोन व्हायोलिन विराजमान आहेत. संगीत विद्यालयात प्रवेश केल्यासारखे वाटत नाही. वादनसामुग्रींची आरास मांडलेले ते सभागृह नाही तर घरातील सर्वांच्या हाताशी रमलेली व रुळलेली वाद्ये म्हणून नित्य उपयोगात. ज्ञानदेव परशुरामकर यांचा सर्व वाद्यांशी परिचय वयाच्या दहाव्या वर्षांपासूनच आहे. शिक्षणासाठी प्रथम ब्रह्मपुरी व नंतर नागपुरात वास्तव्य असले तरी, डोळे पुस्तकात, पण हात वाद्यावर. अभ्यासातील प्रगती व वाद्यांची सलगी सतत जपलेली.

१९७३ ते १९७८ चंद्रपूर, ब्रह्मपुरी व गडचिरोली येथे त्यांनी मनापासून वकिली केली. पैसा मिळवण्याऐवजी माणसे शोधली. माणसांच्या अडीअडचणी व स्वभाव जाणून घेताना त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे निवडणुकीत विजयी होण्याची सामुग्री सहज संपादन करता आली. १९७१ ते १९८१ ते अविभक्त चंद्रपूर जिल्हा परिषदेचे निर्वाचित सदस्य होते. निवडणुकीत विजयी होण्याची गुणवत्ता त्यांनी सिद्ध केली. राजकारणातील त्यांची महत्त्वाकांक्षा बळावली, त्यापेक्षाही कायम निवडणुकीच्या धुराळ्यात रंगलेले आपले प्रतिस्पर्धी म्हणून त्यांचा गंभीरपणे विचार करू लागले. गुणवत्ता हे माणसाला लाभलेले पंख आहेत, पण त्यामुळे विरोधकांची घरे द्वेष व काळजी यांच्या जाळ्यांनी सतत विणली जातात त्याचे काय?

राजकारणी माणसांच्या आश्वासक भाषेचे त्यांना आकर्षण नव्हते. मौनी राजकारणी तर माणसांना वापरून त्यांची वाट लावण्यात अधिक वाकबगार असतात. राजकारणी माणसांचे गणित पक्के असते. गणित सोडविण्याची त्यांनी कोणतीही रीत स्वीकारली तरी प्रथम उत्तर मांडून ठेवण्याची दक्षता ते बाळगतात. ज्ञानदेव परशुरामकर हे वकील राजकारणी, माणसात राहूनही संवेदनशील आहेत. ते नाटकात गुरफटले असल्यामुळे राजकारणी माणसांचा नाटकी सांगावा त्यांच्या लवकर लक्षात आला नाही. नाटकातील संवेदना आणि संवेदनांचे नाटक राजकारण्यांच्या लक्षात येते. रंगभूमीची आराधना करणाऱ्या नाट्य भाविकांच्या लक्षात येत नाही.

रंगभूमीच्या उपासनेसोबत चांगली

चाललेली वकिली त्यांनी सोडली. लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या लेखी परीक्षेत व मुलाखतीत ते उत्तीर्ण झाले. मोठी कमाई असलेल्या वकिलांना न्यायाधीश होण्यात रस नसतो. माणसात रमलेल्या व न्यायाची चाड असलेल्या कायदेपंडितांना न्यायाधीशपदा-बद्दल आपुलकी वाटते. बाजू घेऊन युक्तिवाद करण्यापेक्षा युक्तिवाद ऐकून विवेक करण्यात धन्यता वाटते. १९८१ ते १९९२ ज्ञानदेव परशुरामकर यांनी दिवाणी न्यायाधीश तथा न्याय दंडाधिकारी म्हणून काम केले. भंडारा, गोंदिया, उरमेड व नागपूर येथे न्यायदानाचे काम केले. भंडारा येथे काम करताना जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी त्यांना एकदा विचारले, ''गावात लागलेल्या भव्य व आकर्षक पोस्टरवर पेटीवादक व संगीतदिग्दर्शक म्हणून ॲड. ज्ञानदेव परशुरामकर यांचे नाव व फोटो आहे...'' न्यायाधीशांचा प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच ज्ञानदेव म्हणाले, 'तो मीच!' दिवसा न्यायालयात हाती न्यायदानाचा तराजू व रात्रौ रंगमंचापुढे खोदलेल्या जागेत पायाशी पेटी घेऊन नाट्यसंगीताला न्याय देणारे ज्ञानदेव एकच.

न्यायाधीश ज्ञानदेव परशुरामकर यांनी न्यायाधीशपदाचा राजीनामा दिला. शेती व रंगभूमी यांची ओढ न्यायालयातून बाहेर येण्यास कारणीभूत ठरली. महाराष्ट्राचे प्रभारी मुख्य न्यायाधीश न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी होते. ते म्हणाले, ''तुमचा नाराजीनामा कळत नाही. सद्सद्विवेकाची रोज तालीम देणारे सिंहासन सोडू नका. रंगभूमीला नटेश्वराचे वरदान आहे. न्यायालयात 'सत्यमेव जयते'चाच विचार असतो. तुम्ही वैदर्भीय आहात. अल्पतुष्ट आहात असे मी मानत नाही. चांगली नोकरी म्हणून नव्हे, तर न्यायदानाचे पवित्र कर्तव्य म्हणून या न्यायासनाची महत्ता आहे. विचार करा.'' परंतु ज्ञानदेव परशुरामकर यांनी नोकरी सोडली.

राजकारण की रंगभूमी, लोकन्यायालय की लोकरंजन असा पेच फारच कमी व्यक्तींच्या आयुष्यात आला असेल. राजकारणात निवडून येण्याची हमी असूनही मोठी उमेदवारी केली नाही. राजकारणात माणसाची उमेद संपते. रंगभूमीवर उमेदीचे पाश सतत आवळलेले असतात. रंगभूमीवरील उमेद प्रेक्षकांच्या प्रतिसादाने चैतन्यदायी होते. राजकारणात माणसांचा विचार मर्यादित व संकुचित मोजपट्ट्या लावून होतो, तर रंगभूमीवर प्रेक्षकांच्या प्रशस्तीने जीवनात नवा पल्ला गाठण्याचा हुरूप येतो. राजकारण माणसांना छळते, रंगभूमी माणसांना नव्या नव्या ओळखींचा आयाम देते. न्यायाधीश म्हणून आरोपी व फिर्यादी यांच्यातील घटनांचा संबंध जोडून, गुन्हेगाराला शिक्षा देण्याची संधी असते. परिस्थितीच्या कैदेची शिकार बनलेली माणसे रंगभूमीवर आयुष्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी स्वत:ला तपासून घेऊ शकतात.

आज मराठी रंगभूमीचा प्रवास कुंठित झाला आहे. चांगल्या नाट्यसंहिता नाहीत अशी रास्त तक्रार सर्वत्र आहे. ओस पडलेली प्रेक्षागृहे रसिकांना खेचून आणतील अशी नवी नाटके, नट व दिग्दर्शक नाही. राज्य नाट्यस्पर्धा आहेत. शासकीय प्रोत्साहन आहे. पण रंगदेवता प्रसन्न नाही. उलट झाडीपट्टीतील नाटकांचा हंगाम तेजीत आहे. एकट्या देसाईगंजला ३२ नाटक कंपन्या सिद्ध आहेत. कधीकधी स्थानिक लेखकांनी लिहिलेले नाटक सादर होते. नाट्यप्रेम कायम आहे. नाटक पाहण्याची व सादर करण्याची लोकांची ऊर्मी कायम आहे. चंद्रपूर, गोंदिया, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यांतील प्रेक्षकांचा उत्साह कोमेजलेला नाही. कंपनीचे नाटक ठरले की नाटकस्थळी चार तासांत थिएटर उभे होते. गावातील श्रोते व प्रेक्षक जेवढी मन:पूर्वक हजेरी लावतात तेवढीच गर्दी आजुबाजूच्या गावातील प्रेक्षकांची असते.

झाडीपट्टी रंगभूमीचे कॅलेंडर ठरले आहे. दिवाळीपासून सुरू झालेला हंगाम तेजीत असतो. ३० ते ४० हजार रुपयांत नाटक ठरले तरी प्रत्यक्षात ६० ते ८० हजारांचा गल्ला सहज गोळा होतो. देसाईगंज (वडसा) रंगभूमीचे केंद्र आहे. दरवर्षी १६ व १७ जानेवारीला नवरगाव येथे व्यंकटेश प्रासादिक नाट्य मंडळाचा प्रयोग ठरलेला असतो. घरंदाज कुळाचाराप्रमाणे नाट्यप्रयोग लागतोच.

देसाईगंजच्या बाजूला एकीकडे कुरूळ तर दुसरीकडे विसोरा येथील नाट्यप्रयोग ठरलेले असतात. कुरूळ ८ हजार लोकवस्तीचे तर विसोरा ५ हजार लोकवस्तीचे गाव. कुरूळमध्ये ८ ते १० प्रयोग तर विसोरा येथे ४ प्रयोग. मकरसंक्रांतीनंतरचा तिसरा गुरुवार विसोऱ्याला नाटक तर चौथ्या गुरुवारी कुरूळ येथे प्रयोग ठरलेला. प्रत्येक घरात कुटुंबातील माणसांच्या पाचपट पाहुणे मुक्कामाला असतात. नाट्यप्रयोगाला यात्रेचे स्वरूप आलेले असते. एकाच वेळी, एकापेक्षा अधिक प्रयोग असतात. घराघरात जमलेल्या गोतावळ्याची ती वार्षिक उरभेट असते. त्यात एकमेकांचे अभिनंदन व शुभचिंतन असते. दूरवर वसलेली नातेवाईक मंडळी सोयरिकीचा शोध घेऊन एकमेकांना भेटतात. या मेळाव्याचे आंतरिक स्वरूप वधूवर सूचक मेळाव्यासारखे असते. वातावरण प्रसन्न अन् व्यवहार निकोप असतात. सारे व्यवहार नटेश्वर व रंगभूमीच्या साक्षीने फिरतात. नाटकाभोवती सारा व्यवहार फिरतो किंबहुना सारे गाव नाट्यमय होऊन जाते.

झाडीपट्टी रंगभूमीवर स्थानिक कलावंतासोबत गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई, पुणे व नागपूर येथील कलावंत-कलावती नाटकात काम करीत आहेत. मधुवंती दांडेकर-मोहन दांडेकर, कान्होपात्रा किन्हीकर, मेधा गोगटे, रामदास कामत, चारुदत्त आफळे, अलका कुबल, प्रल्हाद अडफळकर व कविता टिकेकर यांचे झाडीपट्टी रंगभूमीचे चैतन्य कायम ठेवण्यात मोठे योगदान आहे. शिवाय पुष्पा घुळघुळे, शोभा गोरे, मीना देशपांडे,

वत्सला पोलकमवार, प्रभाकर आंबोणे, मधु जोशी, डॉ. परशुराम खुणे, सुमंत गडेकर व पितांबर गोरे यांनी आपली नाट्यसेवा वर्षानुवर्षे रुजू केली आहे. स्वयंवर, सौभद्र, मानापमान, संशयकल्लोळ, शारदा व मृच्छकटिक या नाटकांतील सर्व पदे कंपनीच्या चालीसह ज्ञानदेव परशुरामकर गातात व सहज वाजवून रसिकांना रिझवतात. छोटागंधर्व ऊर्फ मास्टर सौदागर तर झाडीपट्टी रंगभूमीवर गाजलेले आहेत.

संगीत नाटक आजही झाडीपट्टी रंगभूमीवर सतत गर्दी खेचून विद्यमान आहे. ज्ञानदेव परशुरामकर यांना २५ वर संगीत-गद्य नाटके पाठ आहेत. एकाच नाटकात एकापेक्षा अधिक भूमिका त्यांनी केल्या असून नटांच्या गैरहजेरीत वेळेवर भूमिका सादर करून नाट्यनिर्माते व दिग्दर्शक यांना सांभाळून घेतले आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे देवपदाला पोचलेले अजरामर. 'संगीत सौभद्र' यातील श्रीकृष्ण व नारद यांच्या भूमिका व संगीत दिग्दर्शन त्यांनी केले आहे. महाभारतातील सुभद्राहरणाची कथा पौराणिक वलयातून बाहेर काढून मानुषीय स्तरावर कौटुंबिक बनवण्यात किर्लोस्करांना यश आले. श्रीकृष्णाला मानवी रूप देताना बलराम, रुक्मिणी, अर्जुन व सुभद्रा आदींना कौटुंबिक कोंदणात बसवून श्रोत्यांच्या परिचयाची पात्रे उभी करण्यात अण्णासाहेबांना प्राप्त यश नाटकाला अमर करून गेले आहे. 'सिंहाचा छावा'तील द्रोणाचार्य, 'स्वर्गावर स्वारी'तील नारद यांच्या भूमिका परशुरामकरांनी सादर केल्या आहेत. 'महानंदा'तील नारद ही अशीच त्यांची खास जमलेली भूमिका आहे.

'स्वयंवर' नाटकाचे संगीतदिग्दर्शन ज्ञानदेव परशुरामकर यांची खासियत आहे. श्रीकृष्ण-रुक्मिणी स्वयंवराच्या सर्वश्रुत स्वयंवराला श्रीकृष्ण-रुक्मिणी यांच्या चरित्रातील उदात्तता प्रेक्षकांपुढे ठेवताना रसपरिपोषाकरिता श्रवणीय पदे व चाली देऊन काकासाहेब खाडिलकर यांनी मराठी रंगभूमीला वैभवशाली केले. ते वैभव झाडीपट्टीतील श्रोत्यांपुढे ठेवण्याचे कसब ग्रामीण रंगभूमीने जोपासले आहे. स्वयंवरातील श्रीकृष्ण व भीष्म या भूमिका ते करतात. राम गणेश गडकरी यांचे मराठी रंगभूमीला ललामभूत ठरलेले नाटक 'एकच प्याला' यात ते सुधाकरची भूमिका करतात. या नाटकाच्या निर्मितीसंबंधी नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर यांनी 'बहुरूपी' या आपल्या आत्मकथनात दिलेल्या आठवणी हृद्य आहेत. त्याची जाणीव ज्ञानदेव परशुरामकर यांना असल्यामुळे त्यांची भूमिका वेगळ्याच उंचीवर जाते. 'मत्स्यगंधा'तील शंतनूची भूमिका ज्ञानदेव परशुरामकर सादर करतात. महाभारताच्या आदिपर्वातील महर्षी व्यासांनी रंगवलेली ही कथा शंतनू व देवव्रत (भीष्म) यांच्या पायावर उभी आहे. कथानकाचे आकलन नटांच्या सादरीकरणाला उत्कट बनवते याची जाणीव त्यांना आहे.

गाजलेल्या गद्य नाटकांतील त्यांच्या भूमिकाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्या आहेत. 'अश्रूंची झाली फुले'मधील प्राचार्य विद्यानंद, 'लग्नाची बेडी'मधील पराग, 'मी मंत्री झालो'त मुख्यमंत्री, 'बुवा तेथे बाया' मध्ये बुवा, 'तो मी नव्हेच'मध्ये प्रभाकर पणशीकर यांची गाजलेली भूमिका लखोबा लोखंडे, या भूमिका त्यांनी सादर केल्या आहेत. केवळ नाट्यसंहितेवर भर न देता, नाटककारांची प्रकृती, त्यांची इतर नाटके व श्रोत्यांनी त्यांना दिलेला प्रतिसाद या साऱ्यांचे रसायन ज्ञानदेव परशुरामकर यांच्या डोक्यात स्थिर आहे. यशस्वी नाटकाचा पडदा उघडला की प्रेक्षकांच्या टाळ्या पडतात. श्रोत्यांनी खचाखच भरलेले नाट्यगृह पाहिले की त्यांची पावले रंगपटाकडे वळतात. ज्ञानदेव परशुरामकर स्वत: आणि त्यांचे सारे कुटुंबीय नाटक जगत आहेत.

ज्ञानदेव परशुरामकर यांच्या विसोरा गावात दोन महिला मंडळे आहेत. एक शारदा महिला मंडळ आणि दुसरे ज्ञानेश्वरी महिला मंडळ. या दोन्ही महिला मंडळातील भगिनी नाटके सादर करतात. स्त्रियांच्या संचातील पुरुषपात्रांच्या भूमिका सादर करताना ड्रेसेस, पडदे, मेकअप सारे भगिनींचेच असते. यात त्यांची मुले व सुना काम करतात. गावागावात नाट्यजागर करताना, आपल्या संग्रहातील हार्मोनियम अन्य गावातील नाट्यप्रयोगाकरिता ते विनामूल्य देतात. व्यावसायिक रंगभूमीचे सूत्रसंचालन करताना, संस्थांच्या मदतीसाठी प्रयोग लावून त्यांना आर्थिक मदत करण्याचे विक्रमही त्यांनी केले आहेत. नाट्यप्रयोग व नाट्यरंजन यांसोबत लहान गावातील लोकांना सोबत घेऊन, मागासवर्गीयांना नाट्यकला शिकवून नाट्यमंडळे तयार केली आहेत. डोंगर-मेंढासारख्या आदिवासी लोकसंख्याबहुल केवळ ७० घरांची वस्ती असलेल्या गावात हा प्रयोग यशस्वी करून त्यांनी नाट्यमंडळ व श्रोते तयार करण्यात यश मिळवले.

'अश्रूंची झाली फुले' हे वसंत कानेटकरांचे नाटक नाट्यविषयक परिणत प्रज्ञेची साक्ष असल्याचा अभिप्राय नाट्य समीक्षक माधव मनोहर यांनी दिला आहे. प्राचार्य विद्यानंदाची भूमिका प्रभाकर पणशीकर तर लाल्याची डॉ. काशीनाथ घाणेकर चोख बजावत. ज्ञानदेव परशुरामकर या दोन्ही भूमिका आलटूनपालटून करतात. श्रोत्यांच्या प्रचंड टाळ्यांची गदगद दाद ही त्यांची कमाई आहे. ग्रामीण भागातील थकलेल्या प्रेक्षकांच्या-श्रोत्यांच्या जीवनातील 'अश्रूंची फुले' करण्याचे समाधान प्रत्यही त्यांना लाभते. हाच आपल्यासाठी सर्वश्रेष्ठ दैवयोग आहे, या आनंदाचे वरदान घेऊनच त्यांचे सारे व्यवहार सुरू असतात.

**– प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर, गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर ४४२ ४०१

# नवी वाट, नवी दिशा

## ॲड. नीलिमा कानेटकर

रेल्वे ट्रॅकवर जीव देण्यास गेलेल्या सुमनला कविताने, तिच्या मैत्रिणीने, खेचून बाजूला नेले आणि स्वत:च्या घरी नेले. सुमनसाठी मदतीची याचना करायला कविताने मला फोन लावला. सुमन खूपच खचली होती. स्वत:वरचा, आयुष्यावरचा तिचा विश्वास उडाला होता. आत्यंतिक निराशेच्या पोटी तिने आत्महत्येचा मार्ग निवडला होता. तिला समुपदेशनाची गरज होती. ४५ वर्षांची सुमन, २ मोठ्या मुलांची आई होती. मुले नोकरीला होती. १८ वर्षांची असतानाच ब्राह्मण घरातली सुमनने अशोकशी प्रेमविवाह केला. सुमन दिसायला सुंदर होती, कॉलेजमध्ये शिकत होती. कर्मधर्मसंयोगाने तिची अशोकशी ओळख झाली. त्या प्रेमाचे रूपांतर घरून पळून जाण्यात झाले. अशोक कमी शिकलेला होता. त्याचे वडील सफाई कामगार होते. यथावकाश त्याला सफाई कामगार म्हणून नोकरी लागली. फसवल्या गेलेल्या सुमनला दोन्ही घरांतून नाकारले गेले. कोणाचाच आधार नव्हता. संशयी स्वभावाच्या अशोकला सुमनवर ओरडायला, हात टाकायला कोणतेही कारण लागत नव्हते. किंबहुना बायकांना मारझोड करायची त्या घरातील रीतच होती. त्यातच सुमनला २ मुले झाली. मुलांकडे दुर्लक्ष होऊ नये, त्यांना वडिलांचे छत्र राहावे म्हणून सुमनने सर्व त्रास, जाच सहन करून संसार केला. घरातल्या विपरीत वातावरणात मुलांनीही तेच संस्कार उचलले. मोठी झाल्यावर तीही आईला मान देईनाशी झाली. मुले उद्धट झाली. एकदा, एका किरकोळ भांडणाने गंभीर स्वरूप घेतले. मोठ्या मुलाने आईवर हात उचलला आणि घराबाहेर चालती हो, बाहेर 'धंदा' केलास तरी मला काही फरक पडत नाही, या घरात राहू नको असे अपशब्द उच्चारले. आता मात्र सुमन पूर्णपणे खचून गेली. संसाराची, नातेसंबंधातील दुर्दशा अत्यंत दारुणपणे समोर आल्यावर तिने आत्मविश्वासच गमावला, तिला निराशेने ग्रासले आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ती घराजवळच्या रेल्वेलाइनवर जीव द्यायला गेली. सकाळी नोकरीवर निघालेल्या कविताला सुमन विमनस्क अवस्थेत रेल्वेट्रॅकवर आढळली. तिने हळूहळू समजूत घालून सुमनला स्वत:च्या घरी नेले आणि मला फोन लावला.

इकडे मी स्वत: माझ्या जिवलग मैत्रिणीच्या, संगीताच्या शेजारी बसले होते. तिला कॅन्सर झाला होता. ती अत्यंत त्रासात होती. जणू शेवटच्या घटका मोजत होती. तरीही प्रसंगाचे गांभीर्य जाणून मला सुमनला बोलती करावे लागले. आमचा फोन जवळजवळ दोन तास चालला. नंतरही अनेक वेळा तिच्याशी बोलावे लागले. त्यामुळे सुमनमधल्या अंगभूत गुणांना वाव देत, तिचे पुनर्वसन करण्यासाठी हातभार लागला. आज ती नव्या वाटेने मार्गक्रमणा करत आहे.

'आदिपथ फाउंडेशन आणि रिसर्च सेंटर'चे देशभरातील अशा पीडित महिला व मुलांच्या मदतीसाठी विनामूल्य दूरध्वनी सेवा राबवण्याचे महत्त्वाचे कार्य चालते. देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून पीडित व्यक्ती दूरध्वनीवरून संपर्क साधू शकते. अशा व्यक्तीला तज्ज्ञाकडून समुपदेशन केले जाते. विनामूल्य कायदेशीर सल्ला दिला जातो. आवश्यकता असेल तिथे अशा व्यक्तीच्या जवळपासच्या संस्थांची नावे तिला पुरवली जातात. १८०० २२ ०२०५ असा हा दूरध्वनी क्रमांक असून, सोमवार ते शनिवार दुपारी १२ ते संध्याकाळी ६ ही सेवा उपलब्ध असते. आजवर शेकडो पीडितांनी त्याचा लाभ घेतला आहे. दूरध्वनीला लागणारे पैसे आदिपथ संस्था भरते. पीडितांना टेलिफोनचे बिल द्यावे लागत नाही. या फोनची नोंद त्यांच्या वैयक्तिक अथवा घरच्या टेलिफोनच्या बिलात होत नाही. संबंधित त्रास देणाऱ्या व्यक्तीला या संभाषणाची माहिती होत नाही. फोनवरच्या संभाषणाची पूर्णपणे गुप्तता राखली जाते. यामुळे पीडित महिलांना टेलिफोनवर मन मोकळे करून समस्या मांडता येते. त्यांना आधार वाटतो. तज्ज्ञांचा सल्ला मिळतो. त्यांनी किती वेळा फोन करावा अथवा किती वेळ बोलावे यावर बंधन नसते. सामाजिक कार्य करणाऱ्या बिनसरकारी संस्थेने पुढाकार घेऊन, प्रथमच ही सेवा सुरू केली आहे.

'आदी' म्हणजे आरंभ आणि पथ म्हणजे मार्ग, अर्थात 'नव्या मार्गाचा आरंभ' ही संकल्पना या संस्थेचा पाया आहे. देशातील सुमारे ४००० सेवाभावी संस्थांची माहिती 'आदिपथ'कडे उपलब्ध आहे.

२५ डिसेंबर २००८ रोजी ग्रंथालीने 'तिचे अवकाश' हे माझे पहिले पुस्तक प्रकाशित केले. महिलांची सक्षमता या विषयावर हे पुस्तक लिहिले आहे.

पुस्तकानिमित्ताने 'ग्रंथाली' परिवारात माझा प्रवेश झाला. त्याच सुमारास दिनकर गांगल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'बहुमाध्यमयात्रा' योजली होती. या यात्रेत सामील होण्याचा योग मला आला आणि ग्रंथालीबरोबर महाराष्ट्रातील अनेक शहरांतून, गावांतून, जिल्हापातळीवरील अनेक संस्थांतून परिसंवाद, कार्यशाळा घेता आल्या. अनेक महाविद्यालयांतून, मंडळांतून बहुमाध्यमयात्रेत मी आणि माझ्या सहकारी स्वरूपा ढोलम, आम्ही या कार्यक्रमात सक्रिय भाग घेतला. स्त्रियांचे कायदे, स्त्रियांची सक्षमता, विवाहविषयक/विवाहपूर्व समुपदेशन असे अनेक विषय आम्ही राबवले. या कार्यक्रमांतून, गावागावांतून प्रचंड प्रतिसाद लाभला. हा सगळाच अनुभव मला आणि स्वरूपाला अस्वस्थ करणारा होता. गावागावांतून महिलांच्या सामाजिक स्थानाची खरी परिस्थिती काय आहे याची आम्हाला जाणीव झाली. एका बाजूने मुलींच्या शिक्षणाचा प्रसार होत असताना, अनेकजणी शिक्षणात पुढे जात असताना दिसत होत्या. महाविद्यालयेही अनेक मार्गांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून होती. मात्र प्रत्यक्षातील महिलांची सामाजिक स्थिती पूर्णपणे विरुद्ध होती. एका कार्यक्रमाला तर हजर असलेली सरपंच असलेली स्त्री व्यासपीठावर मागच्या रांगेत होती आणि तिच्या घरातले पुरुष पुढे बसलेले होते! सर्व समाजरचनेतच घराघरातून स्त्रियांचा आवाज दबला गेलेला जाणवला. समस्या अनेक होत्या. मार्ग सापडत नव्हते. मार्ग शोधण्याचे धैर्य नव्हते. कोणाकडे मदत मागायची हे कळत नव्हते.

या अनुभवातून माझे खूप खोलवर विचारमंथन झाले. माझा १९७६ पासूनचा समुपदेशक म्हणून अनुभव आहे. १९८२ पासून वकिली व्यवसायातील माझा अनुभव अनेक वर्षांचा आहे. अनेक गरजूंपर्यंत अशा प्रकारच्या सेवा तळागाळापर्यंत पोचत नव्हत्या, समजत नव्हत्या. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, यावर उपाय काय, यावरही मंथन चालू झाले. त्याच सुमारास अमेरिकेत 'मैत्रीण' ही समुपदेशन करणारी 'हॉट लाइन' चालवणाऱ्या सुनीता धुमाळे यांच्याशी माझा परिचय झाला, नव्हे तर दाट मैत्री झाली. त्यांच्या कामातून प्रेरणा घेऊनच, आपल्याकडे देशपातळीवर विनामूल्य दूरध्वनी सेवा उपलब्ध करण्याची दिशा मला मिळाली. बहुमाध्यमयात्रेतून मी आणि स्वरूपाने जे कार्य केले, अनुभव घेतला त्यातूनच आदिपथ संस्थेचा उगम झाला.

'आदिपथ फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर' या संस्थेची स्थापना ८ मार्च २०१० या आंतरराष्ट्रीय महिला दिनी झाली. ही संस्था नोंदणीकृत असून, सेवाभावी संस्था म्हणून कार्य करते. 'महिला व मुलांवरील अत्याचार' या विषयात ती कार्यरत आहे. ही संस्था आज दूरध्वनी सेवेतून शेकडो गरजू महिलांपर्यंत पोचत आहे. अनेक पातळ्यांवर या विषयाशी संलग्न परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा भाषणे असे कार्यक्रम घेत असते. सध्या तरी महाराष्ट्रात हे काम चालू आहे. शहरात व ग्रामीण पातळीवर ही संस्था पोचते. आजवर जवळजवळ २५००च्या वर महिलांनी व इतरांनी या कार्यक्रमांचा लाभ घेतला आहे. अशा कार्यक्रमांतून इतर व्यावसायिकांचाही सहभाग असतो.

ऑगस्ट २०११ मध्ये मुरूडला महाराष्ट्र राज्यविधी सेवा मंडळातर्फे आयोजित केलेल्या परिसंवादात स्त्रियांवरील हिंसाचार व विविध कायदे या विषयावर आदिपथने महिलांना मार्गदर्शन केले. शेकडोंनी महिलावर्ग उपस्थित होता. पुरुषही होते. विशेष म्हणजे काही पोलिस अधिकारीही आवर्जून या कार्यक्रमाला हजर होते. सुमारे ३२ गावांतून ग्रामसेविका, बालसेविका आणि तळागाळात काम करणाऱ्या अनेक महिलांनी या कार्यक्रमामध्ये प्रतिनिधित्व केले. न्यायाधीश स्वरूपा ढोलम यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेतला गेला.

आदिपथ संस्थेच्या परिसंवादाचे विषय पुढीलप्रमाणे असतात.

- विवाहपूर्व समुपदेशन
- घटस्फोटपूर्व समुपदेशन
- कौटुंबिक कलहामुळे मुलांवर होणारे नकारात्मक परिणाम
- स्त्रियांवरील घरगुती अत्याचार
- स्त्रियांविषयीचे कायदे
- मुलांचे हक्क
- स्त्री भ्रूणहत्या
- रागावर नियंत्रण
- पौगंडावस्थेतील मुलामुलींच्या समस्या, त्यांना मार्गदर्शन
- स्त्रिया व मुले यासंबंधातील वाढते गुन्हे

असे विविध विषय घेऊन परिसंवाद आयोजित केले जातात. सहकारी संस्थेच्या सूचना विचारात घेऊन परिसंवादाचे विषय व प्रकार ठरवले जातात. मोठ्या कंपन्यांमधूनही कर्मचाऱ्यांसाठी अशा प्रकारचे कार्यक्रम आदिपथने घेतले आहेत.

या सर्व कामात समाजकार्य विषया-तील विद्यार्थ्यांचा वेळोवेळी सहभाग असतो. समाजातील इतर घटकांचा, महिलांचा सहभाग असतो. घरातील जबाबदाऱ्यांमुळे व्यवसायासाठी, नोकरीसाठी पूर्ण वेळ देऊ न शकणाऱ्या महिला, निवृत्ती घेतलेल्या महिला या स्वयंसेवक म्हणून संस्थेच्या कार्याशी निगडित आहेत. समर प्लेसमेंटच्या मार्गानेही मुंबईतील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थी या कार्याला हातभार लावतात.

समाजप्रबोधनाच्या या कार्यात 'लोकप्रभा', 'माझी सहेली' यांसारख्या विविध नियतकालिकांचे सहकार्य मिळते. टीव्ही चॅनेल्सचाही हातभार असतो. यातून गरजूंना, व्यावसायिक सल्लागार व इतर सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होते. समाजप्रबोधन हे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याने संस्था समस्यांशी निगडित इंग्रजी व मराठी पुस्तके प्रकाशित करते. अनेक व्यावसायिक, समुपदेशक, तळागाळातील वर्गासाठी कार्य कारणारे कार्यकर्ते अशा अनेकांना ही पुस्तके उपयुक्त ठरतात.

भविष्यात या विषयाशी निगडित माहितीपट, चित्रपट, छोट्या चित्रफिती, दूरदर्शन मालिका अशा बहुमाध्यमांतून समाजप्रबोधन करण्याचे प्रयत्न करण्याचा

विचार संस्था करत आहे.अनुषंगिक विविध विषयांवर प्रदर्शने भरवण्याकडेही संस्थेचा कल आहे.

आवश्यक निधीव्यवस्था झाल्यास समुदेशन केंद्र चालवण्याचा संस्थेचा विचार आहे.

या विषयाची, समस्यांची व्याप्ती व गुंतागुंत लक्षात घेता, केवळ प्रतिकारात्मक उपाययोजना अथवा विविध कायदे करून समस्यापूर्ती होत नाही किंवा होणारही नाही. समांतर मार्गाने समाजात बदल घडवून आणण्यासाठी, सामाजिक मतपरिवर्तन घडवून अणण्याचे प्रयत्न करणेही आवश्यक आहे. किंबहुना, तसे प्रयत्न करण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे.त्यासाठी ही संस्था कार्यरत आहे.

समाजप्रबोधनासाठी संस्थेच्या संशोधन विभागाकडून माहितीपूर्ण पुस्तके, पुस्तिका व इतर शैक्षणिक साहित्य प्रसारित होत असते. २०११ मध्ये Opening closed doors understanding domestic violence and alternative solutions to deal with it हे पुस्तक प्रकाशित केले. ‘अखेर न्याय मिळाला...’ हे पुस्तक २७ मे २०१२ रोजी, मुबंईत प्रसिद्ध होत आहे. या विषयावर बहुभाषिक पुस्तके प्रसिद्ध करण्याचा संस्थेचा मानस आहे.

न्यायमूर्ती बी.एन. श्रीकृष्ण (भारतातील निवृत्त न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय), पद्मश्री पंडित सतीश व्यास, डॉ. स्नेहलता देशमुख (निवृत्त व्हाइस चान्सलर, मुंबई विद्यापीठ), कालिंदी मुझुमदार (निवृत्त उपप्राचार्या, कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन, मुंबई), महेश कोठारे (चित्रपट निर्माते, दिग्दर्शक), श्रीमती सुजाता मोहापात्रा (ओडिसी नर्तिका), उर्मिला कानेटकर-कोठारे, कथक नृत्यांगना व अभिनेत्री, अशा अनेक मान्यवरांचा संस्थेला सक्रिय पाठिंबा आहे. त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन असते. हातभार असतो.

संस्थेच्या कार्यात कोणत्याही मार्गाने हातभार लावण्याची इच्छा असलेल्या सर्वजणांचे संस्थेच्या परिवारात स्वागतच आहे. समस्यांची व्याप्ती आणि खोली खूप मोठी आहे. तेव्हा सर्वांच्या सहकार्यानेच हे कार्य प्रभावीपणे पुढे जाणार आहे.

**ॲड. नीलिमा कानेटकर**
अध्यक्ष, उपक्रम समिती
भ्रमणध्वनी : ९९६७०१५१२०
विनामूल्य दूरध्वनी :
१८००२२०२०५
दुपारी १२ ते सायंकाळी ६
(सोमवार ते शनिवार)
aadipath@gmail.com



प्रकाशनसमयी – कवयित्री जयश्री भिसे, उषा मेहता, डॉ. स्नेहलता देशमुख आणि दिनकर गांगल

**मनोमनी**- जयश्री भिसे

**मूल्य ७५ रु. ● सवलतीत ४५ रु.**



# सत्यम्, शिवम्, सुंदरम् : एक मनोवेध

मल्हार ढगे

७ एप्रिल २०११ हा वा.ल. कुळकर्णींचा जन्मशताब्दी दिन. त्या दिवशी वा.लं.शी निकटचा भावबंध ठेवणाऱ्यांसमवेत असताना त्यांच्याबद्दलच्या आठवणींचा एकदम उमाळा आला. सरांच्या स्वाभाविक जिव्हाळ्यामुळे त्यांच्या जवळिकेचा कालपट मनासमोर हळूहळू उभा राहिला.

...मागच्या शतकाची चाळिशी. आमच्या गिरगावातल्या नामवंत विल्सन हायस्कूलमध्ये मी प्रवेश परीक्षा दिली. मग त्या शाळेतल्या 'फर्स्ट बी' या तुकडीत मी दाखल झालो. पहिलीत आम्हाला पहिल्या प्रथमच इंग्रजी शिकवायला आले, ते वा.ल. कुळकर्णी. सरांनी बोलता बोलता इंग्लिश शिकवायला सुरुवात केली. त्यांनी स्वत:च्या वहीतले एक-दोन कोरे कागद फाडले आणि ते चुरगाळून कागदाचा चेंडूएवढा एक मोठा गोळा केला. तो हातात घेऊन ते म्हणाले, ''धिस इज अ पेपर बॉल.'' नंतर तो दूरवर फेकून म्हणाले, ''दॅट इज अ पेपर बॉल.'' वर्गात येताना 'प्लीज सर, मे आय कम इन' आणि वर्गाबाहेर जाताना 'मे आय गो आउट, सर' असं आम्ही म्हणू लागलो. इंग्रजी भाषा ऐकल्या-बोलल्यामुळे तोंडात रुळू लागली. परकी भाषा आमच्याजवळ ठेवणाऱ्या आमच्या सरांनी इंग्लिश शिकण्याचा आमचा आत्मविश्वास बळावत नेला. पुढे पुढे इंग्लिश आमच्या बोलण्यात-वाचण्यात-लिहिण्यात येऊ लागली. परदेशातली भाषा शिकण्याचा अभूतपूर्व अनुभव, आम्ही पहिल्याच वर्षी वा.ल. कुळकर्णी यांच्याकडून घेतला.



विल्सन हायस्कूलमधले आमचे इंग्रजीचे अध्यापक काच्या मारून धोतर नेसलेले, कोट घातलेले आणि ओठावर ढेकूणकट मिशी ठेवलेले असे होते. (वामन लक्ष्मण) कुळकर्णी सरांच्या चेहऱ्यावरचा कणखरपणा त्यांच्या कपाळावरून आणि डोळ्यांवरच्या चष्म्यामुळे जाणवायचा. त्यामुळे त्यांचा काहीसा दबका दरारा वाटायचा, पण शिकवायला लागल्यावर मात्र ते अतिशय तद्रूप आणि तन्मय होऊन जात. हायस्कूलातल्या वरच्या वर्गांना मराठी शिकवत असल्याने ते विद्यार्थ्यांच्या तपासलेल्या वह्यांवर 'वा.ल.कु.' अशी संक्षिप्त सही करत. त्यामुळे ते ज्येष्ठ विद्यार्थ्यांकडून 'वालकु'सर या नावानं ओळखले जात. आचार्य अत्रे व वि.द. घाटे यांच्या 'अरुण वाचनमाला' या पाठ्यपुस्तकांसोबत हरि नारायण आपटे यांच्या 'स्फुट गोष्टी', नाथमाधवांचं 'सावळ्या तांडेल', लक्ष्मीबाई टिळकांचं 'संक्षिप्त स्मृतिचित्रे', मोरोपंतांची 'केकावली', वि.द. घाटे यांचं 'काही म्हातारे व एक म्हातारी', 'ना.सी. फडके : वाङ्मयदर्शन' - अशा वर्गवारीची पहिली ते सहावीपर्यंतची पुस्तकं पुरवणी-वाचनासाठी लावलेली होती.

विल्सनमधल्या विद्यार्थ्यांसाठी वा.लं.नी मामा वरेरकर, आचार्य अत्रे, राजकवी यशवंत यांच्यासारख्या थोर साहित्यिकांना, शाळेत भाषणासाठी बोलावलं होतं. नाटककार मामा वरेरकरांनी अगदी साध्या मराठीत विद्यार्थ्यांना उद्‌बोधक असं भाषण केलं. वा.लं.नी त्यांची ओळख करून देताना ''हे मामा म्हणजे तुमचे आजोबा आहेत बरं का!'' म्हणून सांगितलं. कवी यशवंतांनी आम्ही पहिलीत अभ्यासलेली 'अजुनी कसे येती ना, परधान्या, राजा। किरकिरती रातकिडे, झाल्या तिन्ही सांजा' आणि 'जगा, तुझी सारी तऱ्हा सदा उफराटी' या 'यशोधन'मधल्या कवितेसोबत त्यांच्या 'मोतीबाग' या बालकवितासंग्रहातून फिरवून आणलं. 'आला पाऊस, खिडक्या दारे खोला' या लहानग्यांच्या आणि 'आला पाऊस, लावा रे खिडक्या दारे' या मोठ्यांच्या; अशा वेगवेगळ्या कविता अत्यंत सुलभ पद्धतीनं त्यांनी म्हणून दाखवल्या. राजकवी यशवंतांचे 'मोतीबाग' हे दीनानाथ दलालांच्या उत्तम रेखाचित्रांसह असलेलं बालवाङ्मयातलं अत्यंत देखणं आणि राजेशाही पुस्तक! वडिलांनी ते विकत आणून दिल्यावर मी अतिशय आनंदित झालो.

एकदा वर्गात लिहून घेतलेली 'जात्यावरचं गाणं' ही कविता माझ्या मोठ्या

भावानं, विल्सन शाळेत असताना घरी आणलेली होती. अनुपस्थित अध्यापकांच्या तासावर आलेल्या मराठीच्या सरांनी ती आधी म्हणून दाखवलेली असावी. ग.ल. ठोकळांचं ते जानपदगीत विद्यार्थ्यांना वर्गात टिपून घ्यायला लावणारे 'वालकु'सर होते. 'झुंजुमुंजू झालं, सुकदेव वर आला। पहाटेचं वारं कसं झोंबतं अंगाला' या, वाऱ्यासारख्या लहरत आलेल्या ओळी आमच्या साऱ्या घरात शब्दाशब्दांतून आनंदलहरी पसरत राहिल्या. 'जात्यावरच्या गाण्या'त एका व्याकुळ कारभारणीच्या जीवातून ओसंडून गेलेले आर्त भाव शब्दबद्ध झाले, स्वरबद्ध होत राहिले. ''कवाशिक याल माझ्या कुडीतल्या जीवा? कवाशिक याल माझ्या देवाच्याबी देवा?'' जात्यावरच्या दळण्याच्या लयीत तोंडामधून बाहेर पडणारे त्या गाण्याचे सूर, संगीतातल्या सात स्वरांच्या विश्वात घेऊन जातात.

शालेय जीवनाच्या सुमारास शिक्षणाचा अरुणोदय झाला, तेव्हा पहाटेच्या वेळचा शुक्रतारा उगवललेला होता. पुढे कला-वाङ्मयाच्या सौंदर्यसागरात शतमुखांनी सहज प्रवेश करणाऱ्या देखण्या नदीचा, तो एक उगमाकडील लहानसा सुंदर स्रोत होता. थोड्याशा कालांतरानं विल्सन कॉलेजमध्ये शिकवणारे प्राध्यापक वा.ल. कुळकर्णी विल्सन शाळेत केवळ शालान्त परीक्षेसाठी मराठीचा वर्ग घ्यायला मोठ्या प्रेमानं येत. हे प्रेम मराठीवरचं तसंच विल्सनवरचं नि विद्यार्थ्यांवरचंही! 'ए' आणि 'बी' या दोन्ही तुकड्यांमधले शालान्त परीक्षा-वर्गातले मराठीचे विद्यार्थी दरेक बाकावर तीन-तीन जणं बसून, एकतानतेनं वा.लं.चं शिकवणं, लक्ष केंद्रित करून ऐकत. सरांच्या शिकवण्यातून कानांवर पडलेली मराठी भाषा आमच्या हृदयात कायमची जाऊन बसायची. त्यांनी केलेल्या एखाद्या धड्याच्या आदर्श, नमुनेदार किंवा अभिवाचनानंतर धडा समजावून देण्याची फारशी गरजच उरत नसे. मायबोली मराठीशी एक विलक्षण आत्मीयता त्यांनी आमच्या मनात रुजवली.

वा.ल. विद्यार्थ्यांसमोर 'वाङ्मय' हा शब्द 'साहित्या'ऐवजी नेहमी वापरायचे. कदाचित विद्यार्थ्यांच्या समजुतीत 'साहित्य' म्हणजे 'सामग्री' असावी. वाङ्मयाचा अध्यापक आपल्या मुखोद्गारामधूनच विद्यार्थ्यांशी संपर्कक्रिया साधतो. आशयाचाच हा तोंडी आविष्कार म्हणजे अध्यापनाचा मूलाधार! वा.लं.नी शिक्षण-शास्त्रामधली बी.टी. ही पदवी मिळवली होती, पण ती कधीच धारण केली नाही. शालान्त परीक्षेसाठी असणाऱ्या गद्य-पद्य वेच्यांतल्या काही पाठांचं अभिवाचन हे वस्तुपाठच असायचं. वा.ल. थेट पुस्तका-तल्या धड्याचा मथितार्थ, पाखराला पकडल्यागत अलगद विद्यार्थ्यांच्या आकाशात सोडून देत. विद्यार्थी तेव्हा त्या वेगळ्या वातावरणात विहरत. मधूनच 'काय मजा आहे की नाही!' असा उद्गार एखाद्या गायक-उस्तादाला शोभेलशा थाटात, भिवया उंचावत काढत. पुस्तकातल्या गद्य किंवा पद्य पाठावरचं विद्यार्थ्यांचं भान काही सुटत नव्हतं. कवितेतलं वाचन करत असताना कवितेतला अनुभव जणूकाही आपलाच आहे, अशा ईर्ष्येनं सर प्रगट करत. त्यांचा स्वच्छ आवाज धारदार होत असे. वा.लं.च्या वाचण्यातून ते कवितेचं अंत:स्वरूप दाखवण्यासाठी मनोज्ञ दर्शन घडवायचे.

वा.लं.नी शिकवलेल्या काही ओळी अजून कानांत गुंजताहेत. कलावंताचा प्रखर आत्मविश्वास दाखवणाऱ्या 'आम्हाला वगळा, गतप्रभ झणीं होतील तारांगणे। आम्हाला वगळा, विकेल कवडीमोलापरी हे जिणे।' या ओळी असोत वा 'हाहा:कार जाहला, प्रगटला पुकार शहरात, बंद पडली भणभणीत दुकाने भर बाजारात' हे शाहीर प्रभाकराचं 'सवाई माधवरावाच्या मृत्यू'वरचं शाहिरी कवन असो, वा 'मन्मतिदरीत न शिरे कोपमतंगज विवेक हरी जागे' हा मोरोपंतांच्या पंडिती कवितेमधला स्वभावदर्शक करारीपणा असो - प्रत्येक वेळी कवितेच्या गाभाऱ्यात जाऊन काव्यानुभवाच्या दर्शनाला आपण उभे राहतो अन् त्या त्या वेळी कवितेचा पुनर्जन्म झालेला असतो. 'पूर्णोत्थापन काळ तोचि पतनप्रारंभही होतसे' हा 'बी' कवींचा जीवनदर्शी विचार, विद्यालयीन जीवनात कुठंतरी रुतून बसला होता.

लेखन शुद्ध स्वरूपात लिहिण्यासाठी वा.ल. फार काळजी घेत. एक तास वीस मिनिटांच्या अवधीत, जे आम्ही अगोदरच्या वर्षांत शिकलेलो नव्हतो, ते शुद्ध लेखनाचे नियम आम्ही काळजीपूर्वक शिकलो. ऱ्हस्व 'मि'ला सर तांदळातल्या खड्यासारखे फेकून देत. 'मी', 'नाव', 'आंबा', 'सीता', 'सुशीला', 'दीपावली', 'आशीर्वाद'सारखे शब्द आम्ही विचारपूर्वक आणि न चुकता ध्यानात ठेवले. वा.लं.कडून मराठी व्याकरणातल्या पारिभाषिक संज्ञा, नाम, सर्वनाम इ. शब्दांपासून वाक्यांच्या पृथक्करण आणि संश्लेषण यांच्यापर्यंतचं सगळं भाषाव्यवहाराचं शास्त्र अगदी शास्त्रशुद्धपणे शिकलो. शुद्धलेखनाचे विविध नियम आमच्या लक्षात आणून देण्यासाठी त्यांनी काय केलं केलं? तर जाणूनबुजून अशुद्ध उतारा त्यांनी फळ्यावर सुंदर अक्षरांत लिहिला. फळ्यावरील त्या अशुद्ध लेखनातलं त्या सुवाच्य अक्षरांनी आमचं लक्ष लगेच वेधून घेतलं. अशुद्ध लेखनामागचे शुद्धलेखना-बाबतचे नियम व्यवस्थितपणे समजावून घेताना, त्यांचा मूळ उतारा शुद्ध झाल्यावर त्या लेखनाला सोन्यासारखी झळाळी लाभली. भाषांतरासाठी म्हणून इंग्रजी वाङ्मयातले परिच्छेद वर्गात स्वत:च्या सहभागात विद्यार्थ्यांकडून करवून घेत.

भर्तृहरीच्या 'नीतिशतका'तल्या श्लोकांचं वामन पंडितांनी केलेलं भाषांतर छापताना, वेच्यांच्या संपादकांनी 'संभोगे शिणली जशी नववधू, हस्ती न मस्तावला' या काव्यपंक्तीतल्या पहिल्या शब्दाच्या जागी तीन फुल्या टाकल्या होत्या. वा.लं.नी प्रारंभीच तिथं मराठी अनुवादातल्या शब्द टाकण्यास स्पष्टपणे सांगितलं. पौगंडा-वस्थेतल्या त्या विद्यार्थ्यांसाठी तो शब्द संयतपणे, न खळाळता लिहिला. सरांनी एकूणच ती सौंदर्यलक्षणं उत्तम प्रकारे

शिकवली. स्वच्छ उच्चार, समतोल विचार, भाषेचा समर्पक वापर, अभ्यासूवृत्ती, निर्दोष लेखन यांचे संस्कार आमच्यावर जसजसे घडत गेले, तसतशी आमची व्यक्तित्वं घडत गेली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. भाषा व वाङ्मयातली शिस्त त्यांनी लादली नाही, तर झिरपवली.

गिरगावातल्या विल्सन हायस्कूलमधून चौपाटीवरच्या विल्सन कॉलेजमध्ये गेल्यावर, तिथल्या मोकळ्या हवेत वाङ्मय-कलांचं विलक्षण आकर्षण प्रा. वा.ल. कुळकर्णी यांच्यामुळे निर्माण झालेलं होतं. तिथल्या महाविद्यालयीन वातावरणात साहित्यक्षेत्रात रमण्याची प्रवृत्ती वाढत चालली. तोपर्यंत मराठी कवितेची ओढही अंतरंगात दाटू लागली. शाळेपासून परिचयाचे झालेले कवी कुसुमाग्रज यांच्या काव्यामधलं सौंदर्य आणि सामर्थ्य अंतर्मनात जाणवायला लागलं. त्यांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत सूर्यावरच्या उत्कट प्रेमभावनेनं भारावून गेलेल्या पृथ्वीनं, 'नको क्षुद्र श्रृंगार तो दुर्बळांचा। तुझी दूरता त्याहुनी साहवे' असं म्हणत ती सूर्याभोवती युगानुयुगे फिरतच राहिली. भक्तिसमान असणाऱ्या प्रेमाच्याही 'सलोकता' या पहिल्या पायरीवरच ती राहिली. प्रेमाच्या आणि भक्तीच्या पायऱ्या म्हणजे 'सलोकता', 'समीपता', 'स्वरूपता' आणि सायुज्जता'. भक्तीच्या सायुज्जतेच्या अंतिम पायरीवर केवळ 'भाव तेथे देव' मानणारे थेट एकजीव होऊन जातात. उत्कट अशा काव्यानंदात पार भिजवून टाकणारे वा.ल. त्यांच्या विद्यार्थ्यांनाही 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असा अनुभव देत. गंमत म्हणजे विज्ञानाचे अथवा इतर विषयांचे विद्यार्थीसुद्धा मोकळा वेळ असल्यामुळे परवानगी घेऊन बसणारे आणि वर्गाबाहेर उभे राहून वा.लं.च्या मराठी 'लेक्चर्स'चा लाभ घेत.

विल्सन कॉलेजच्या 'मराठी वाङ्मयोत्तेक मंडळा'च्या स्नेहसंमेलन प्रसंगी, मी विद्यार्थी कार्यवाह (हा शब्द वालंनीच 'चिटणीसा'ऐवजी उपयोजित केलेला होता.) असताना 'उद्धमसिंगाचा पोवाडा' गाण्यासाठी शाहीर अमरशेख यांना मंडळानं निमंत्रित केलं होतं. आपल्या कार्यक्रमात ते साम्यवादी पक्षाचा नक्कीच प्रचार करतील, असा दाट संशय आमच्या मंडळाध्यक्षांनी व्यक्त केला. मराठी विभागाचे प्रमुख प्रा. वा.ल. कुळकर्णी यांच्या कानावर ही बाब घातल्यावर 'अमरशेखांच्या प्रचाराचा परिणाम आपल्यावर झाल्यास आपण कमकुवत आहोत आणि ते मात्र प्रभावशाली आहेत, असं मानावं लागेल. परंतु तसं काही आपल्या बाबतीत होणार नाही, याबद्दल खात्री असू द्या. आपण बुद्धिप्रामाण्यवादी शिक्षणार्थी आहोत, म्हणून उद्धमसिंगच्या ऐतिहासिक पोवाड्याचा रसास्वाद जरूर घेऊ', असं वालंनी सांगितलं. विशेष म्हणजे अमरशेख यांनी 'माझ्या पोवाड्यात प्रचार होतोय असं वाटल्यास ताबडतोब पडदा पाडा अन् माझं पोवाडा-गायन थांबवा', असं मोकळेपणानं सांगितलं. आमच्या कॉलेजच्या हॉलमध्ये अमरशेखांनी अत्यंत स्फूर्तिदायकपणे तो तडफदार पोवाडा खणखणीत आवाजात गाऊन दाखवला. कुणालाही पडदा पाडावा, असं कधीच वाटलं नाही. विद्यार्थी व प्राध्यापक सर्वजण त्या पोवाडा-गायनात रंगून गेले. शाहीर अमरशेखांनाही मनमुराद समाधान वाटलं.

विल्सन कॉलेजमधून शिकवण्याचे तास संपल्यावर, ते लगेच फोर्टमधल्या जे.बी. पेटिट 'लायब्ररी'त जाऊन शुद्ध आणि सुंदर अक्षरांत अभ्यासपूर्ण लेखन, टिपण व वाचनसुद्धा करत. लहानपणापासून चित्रकलेची आवड असल्यामुळे ते लायब्ररीतून 'जहांगीर आर्ट गॅलरी'त प्रदर्शनं पाहण्यास जात. तिथंच मी अदि दावियेखालांची काष्ठशिल्पं आणि पिलू पोचखानावालांची लोहशिल्पं पाहिली. त्या संयुक्त प्रदर्शनातलं 'शाळा सुटताना' हे पिलू पोचखानावालांचं शिल्प मला खूपच आवडलं. शाळा सुटल्याचा आनंद लहान विद्यार्थ्यांना, शाळेच्या जिन्याच्या पायऱ्या उतरताना होणाऱ्या त्यांच्या लोहपड्यांच्या जलद लयीचा आवाज, प्रेक्षकाच्या हृदयात उमटायचा. ह्याच पिलू पोचखानावालाचं 'बर्ड अव्ह फायर' हे लोहशिल्प बरीच वर्षं वरळीच्या हाजी अलीच्या समोरच्या रस्त्यावर उभारलेलं होतं. त्या दोघा शिल्पकारांच्या प्रदर्शनावर लिहिलेलं समीक्षण वालंना दाखवल्यावर त्यांनी मला ते 'मौजे'त धाडायला सांगितलं. पण माझ्या समजुतीप्रमाणे ते प्रदर्शन होऊन गेल्याला बरेच दिवस झाल्यामुळे मी 'मौजे'त द्यायचं टाळलं. पण नंतर मात्र माझी समीक्षणं/परीक्षणं टोपण नावाने प्रसिद्ध व्हायला लागली. पुढे 'मौज', 'सत्यकथा', 'आलोचना' इत्यादीत माझे लेख प्रकाशित झाल्याचा सुखद अनुभव मी मनात जपून ठेवला.

वाङ्मयीन दृष्टी देता देता ललित-कलांची कवाडंही वा.लं.नी उघडी केली. साहित्य संघाची नाटकं तर ते पाहतच, शिवाय अलेक पदमसींच्या 'थिएटर ग्रूप'ची आणि इब्राहिम अल्काझींच्या 'थिएटर युनिट'ची इंग्रजी नाटकंसुद्धा ते पाहत. नाटकांचं उगमस्थान एकतर स्वतंत्र असतं, नाहीतर साहित्याशी (अनुवाद, कथा, कादंबरी यांच्याशी) निगडित असतं. त्यामुळे मनोरंगभूमीवरची अमूर्त माणसं समूर्त होऊन, दृक्‌श्राव्य रंगभूमीवर मूर्तिमंत व्हायची. शाळा-कॉलेजात असताना नाटकात व अभिनयात माझं थोडंफार पाऊल पडलेलं होतं. त्यामुळे नाट्यकलेवर माझा जीव जडलेला होता. 'थिएटर युनिट'ची सोफोक्लिसची 'इडिपस रेक्स' ही ग्रीक शोकात्मिका पाहिल्यावर, आयुष्यभर टिकून राहणारा कलात्मक अनुभव मनाशी बाळगून होतो. शोकपर्यवसायी नाटकामुळे उद्‌भवणारा नाट्यानंद हा कशा प्रकारचा असतो, याची हळूहळू जाणीव झाली. मनातल्या शोकभावनेचं विरेचन झाल्यावर नाट्यकृतीचा आनंद लाभतो. नर्गीस कावसजी, बोमी कापडिया आणि दिग्दर्शक इ. अल्काझी हे अभिनेते होते. नाटकाच्या कोरसमध्ये विल्सन कॉलेजमधल्या विजया जयवंतही होत्या. माधव मनोहर, अनंत काणेकर, वा.ल. कुळकर्णी, रा.भि. जोशी,

म.वा. धोंड यांच्यासारख्या ज्येष्ठ-श्रेष्ठ साहित्यिकांनी तो चिरस्मरणीय नाट्यप्रयोग पाहिला. सभोवार बसलेल्या मर्यादित प्रेक्षकांच्या पायांखालच्या हिरवळीवरच्या भूमीवर ती रंगभूमी डोळ्यांसमोर जिवंत झाली. मलासुद्धा तो नाट्यप्रयोग प्रत्यक्ष पाहण्याचं भाग्य लाभलं!


चित्रपट या कलेच्या विश्वास कलावगाहन करण्याची सुवर्णसंधी मला उपलब्ध झाली. १९७५च्या सुमारास पुण्यातल्या 'फिल्म इन्स्टिटच्यूट अव्ह इंडिया'च्या पहिल्याच चित्रपट-कला आस्वादाचे दृढमूल अभ्यासवर्ग घेण्यात आले होते. प्रा. सतीश बहादूर यांनी सर्वोत्कृष्ट अशा कलात्मक चित्रपटांसारख्या दृश्य-श्राव्य माध्यमाचं रसग्रहण करणाऱ्या मार्गावर आणून ठेवलं. वा.लं.मुळे आस्वादनाचा स्रोत व्यापक होणं, अगदी नैसर्गिक झालं!

वालंनी जीवनभर दिलेलं संपन्न देणं विद्यार्थ्यांच्या एका प्रगाढ संचितात जमा झालं. कला-साहित्याचं चैतन्यमयी भान देणारं प्रसन्न असं व्यक्तिमत्त्व वालंचं होतं. वालंचं साहित्यिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्कार हे सत्यम्, शिवम्, सुंदरम्चेच होते. विश्रब्धपणे मनाच्या एकांतात डोकावताना वा.लं.च्या विद्यार्थ्यांना अजूनही त्यांची कला-वाङ्मयविषयक आत्मीयता जाणवतेय. कला-वाङ्मयाचा आस्वाद आणि अध्यापनाची आवड ही माझ्या दृष्टीनं 'स्वान्तः सुखाय' होती.

जीवनातल्या सत्यम्, शिवम्, सुंदरम्चा मनोवेध म्हणजेच आमचे वा.ल.!

**– मल्हार ढगे**
३/ तळमजला, गिल्बर्ट बिल्डिंग (प),
बाबुलनाथ दुसरा काटरस्ता,
मुंबई -४०० ००७
दूरध्वनी : २३६७ २१ ३५

**ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रामार्फत नुकताच प्रसिद्ध झालेले दोन कवितासंग्रह**




## ओळखीची वाट – नीला सत्यनारायण

पूर्वीपेक्षा आताची स्त्री अधिक सुशिक्षित, अधिक प्रगत, अधिक मोकळी आहे खरी, पण अजूनही ती स्त्रीपणातून पूर्णपणे मुक्त होऊन माणूसपणात आलेली नाही. अजून तिचं वस्त्रहरण थांबलेलं नाही, अजून तिचं अग्निदिव्य संपलेलं नाही. अशा या अनुभवांच्या ओळखीच्या पण अनोळखी वाटा.

**मूल्य १५० रुपये ● सवलतीत ९० रुपये**

## दुःख माझे कोवळे – प्रतिभा सराफ




'मात्र एक नाही' व 'मातीत पूर्णत्वानं रुजण्यापूर्वी' ह्या कवितासंग्रहांद्वारे प्रतिभा सराफांनी आपले 'कवीपण' समर्थपणे सिद्ध केलेले आहेच. आता त्या जाणीवपूर्वक गझललेखनाकडे वळल्या आहेत. 'अभ्यासोनी प्रकटावे' ह्या पध्दतीने. केवळ चूष म्हणून किंवा आज गझलांना बरे दिवस आले आहेत म्हणून नव्हे, तर हे 'कोवळे दुःख' तितक्याच तरलपणे आणि नेमकेपणाने, तरीही 'लिरिकली' व्यक्त होण्यासाठी गझलनेच त्यांना खुणावले म्हणून. गझल हा काव्यप्रकार तंत्रानुगामी असल्याने कवीची कसोटी पाहणारा आहे. तंत्र सांभाळूनही गझलेला कवितेच्या पातळीवर नेण्यासाठी समर्थ प्रतिभेचाच कवी हवा. प्रतिभा सराफांना तशी प्रतिभा आणि शब्दांची अतिशय चांगली जाण लाभली आहे. मराठी गझलरसिक ह्या तरल स्त्री-जाणिवांच्या गझलांचे नक्कीच स्वागत करतील. – सदानंद डबीर

**मूल्य ६० रु. ● सवलतीत ३५ रु.**

# चौथीचा वर्ग

## डॉ. माधवी मेहेंदळे

आठवायचा प्रयत्न केला, काय काय आठवतंय? पांढरा ब्लाऊज, मरून लाल स्कर्टची गर्दी अस्पष्टशी. पायात बूट-मोजे नाहीत. कुठलीशी चप्पल. बऱ्याच जणांच्या पायात काही नसायचंही. दोन-चार जणांच्याच कपड्यांना इस्त्री असायची. बाकीच्यांचे तारेवरचे वाळलेले तसेच काढून अंगात घातलेले.

शाळा ४-५ किलोमीटरवर. खूप लांब वाटायची. रस्त्याच्या एका बाजूला शाळा व दुसऱ्या बाजूला दुकानं होती. दुकानात पुढच्या फळीवर अनेक बरण्यांत भरलेला रंगीबेरंगी खाऊ असायचा. तो सारखा खुणावायचा, घ्यावासा वाटायचा! पण तेव्हा ती न परवडणारी चैन होती.

एकदा आईनं कशासाठी तरी चार आणे दिले. जीवापलीकडे जपत ते कंपासपेटीत ठेवले. आता समोरच्या दुकानात जायचं आणि पाय उंचावत एका बरणीकडे बोट दाखवायचं. त्या बरणीतल्या आंबटगोड गोळ्या खाणं म्हणजे त्या वयातली एक दिव्य अनुभूती! बरण्या आपल्या उंचीपेक्षा कितीतरी उंच ठेवलेल्या असायच्या. त्यामुळे त्या अधिकच अप्राप्य वाटायच्या.

वर्गात सर काहीतरी शिकवत होते. तसं लक्ष तिकडे कधी असायचं कधी नसायचं. पण आता लक्ष मात्र सारखं त्या कंपासपेटीकडे. मधली सुट्टी कधी एकदा होते आणि कधी एकदा तो मोठा रस्ता ओलांडून खाऊच्या बरणीपर्यंत पोचतो असं झालं होतं. आता वाटतं, की त्या आंबटगोड गोळ्या चघळण्याचा आनंद मिळणार होता, त्याहीपेक्षा त्या गोळ्या विकत घ्यायची कुवत आपल्याकडे आली, याचा आनंद अधिक होता की काय! मग मात्र मधली सुटी होईपर्यंतही धीर धरवेना. करंगळी दाखवून वर्गाबाहेर जाण्याची परवानगी सरांकडे मागितली आणि बाथरूमकडे न जाता भराभरा पायऱ्या उतरून रस्त्यावर धूम ठोकली.

सरांनी नेमकी वर्गात काही गणितं टाकली आणि स्वत: गॅलरीत आले. गॅलरीतून थेट समोरचं दुकान दिसायचं. त्यात टाचा उंचावून गोळी घेतानाचा माझा लहानसा ठिपका त्यांना दिसला असावा. विजयी मुद्रेनं गोळी घेऊन मी वर्गात आले. त्यांचा चेहरा बघितल्यावर आपली चोरी पकडली गेल्याचं लक्षात आलं. विचारल्यावर मी प्रामाणिकपणे माझी अधिरता सांगून मोकळी झाली असावी. नंतर काय झालं याची आठवण मनावर नीटशी कोरली गेलेली नाही. याचाच अर्थ फार काही शिक्षा झाली नसावी. बालमानसशास्त्र न शिकलेले त्यावेळचे शिक्षक ८-९ वर्षांच्या मुलीची मानसिकता समजू शकले असावेत.

तेव्हा सर गणिताच्या तोंडी परीक्षेत नेहमी एक गुगली टाकायचे. एक कपडा वाळायला पाच मिनिटं लागतात तर चार कपडे वाळायला किती लागतील? बहुतेकजण चारा पंचे वीस असं तोंडी गणित करून चटकन 'वीस' असं उत्तर द्यायचे. मग ते हसून सांगायचे, की अरे, दोरीवर सगळे कपडे एकदमच नाही का वाळणार? का एक वाळल्यावर मग दुसरा, त्यानंतर तिसरा असं टाकणार... सर्वांचे चेहरे एवढं साधं कसं सुचलं नाही असे गोरेमोरे.

तेव्हा 'एप्रिलफूल'चा जमाना होता. एक एप्रिलला सकाळपासूनच जो दिसेल त्याला एप्रिलफूल बनवायचा सपाटा सुरू असायचा. त्यात अगदी साध्या बावळट 'एप्रिलफूल'पासून शक्कल लढवून काहीतरी क्रिएटिव्ह एप्रिलफूलपर्यंत सर्व प्रकार असायचे.

मी चौथीच्या वर्गाची मॉनिटर! म्हणजे तेव्हाचं फारच महत्त्वाचं पद. त्यामुळे आपण काहीतरी विशेष प्रकारचं एप्रिलफूल केलं पाहिजे असं मला वाटलं असावं. तेव्हाचे आमचे खेळही साधेच असायचे. म्हणजे साधनं साधी असायची. एक बांगडी घ्यायची. त्याला एक आडवा रबरबँड चढवायचा. त्या रबरबँडमध्ये एक अगदी छोटा पेन्सिलचा तुकडा. म्हणजे बरीचशी पेन्सिल (शिसपेन्सिल) वापरून झाली की शेवटचं जे थोटूक राहतं ते. तो तुकडा एका बाजूनं असा गोल गोल फिरवायचा की रबरबँडला खूप पीळ बसेल. पीळ सुटणार नाही याची काळजी घेत ती बांगडी एका 'एप्रिलफूल' असं मोठ्या अक्षरात आतल्या बाजूनं लिहिलेल्या जाडसर कागदाच्या गच्च पुडीत ठेवायची.

हा सगळा प्रकार हातात घेऊन साळसूदपणे हेडमास्तरांच्या खोलीत गेले. त्यांना सांगितलं, वडिलांनी तुमच्यासाठी चिठ्ठी दिली आहे. मी बाहेर आले. मला माहीत होतं की कागदाची पुडी उघडताक्षणी रबरबँडचा पीळ सुटणार, त्यात अडकवलेला पेन्सिलचा तुकडा गोल गोल फिरल्यामुळे कागदाचा आवाज होणार आणि तो तुकडा पीळ सुटून अचानक उडून बाहेर पडणार नाहीतर सरांच्या अंगावर कुठेतरी आदळणार, सर एकदम दचकून मागे होणार...

नंतर प्रार्थना होती. शाळेची सर्व मुलं रांगेत उभी होती. सदा सर्वदा योग तुझा घडावा, गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु - असं कोरस सुरू होतं. मी मान खाली घालून होते. उत्साहाच्या भरात खोडी करून तर चुकले होते. आता काय याची प्रचंड धाकधूक मनात! हेडमास्तर म्हणजे त्या प्रायमरी शाळेतील सर्वात मोठं पद. त्यांचं नावही तसंच मोठं होतं- 'चिंचमलातपुरे'. गुडघ्याच्या खालपर्यंत कोट, त्याखाली धोतर व डोक्यावर टोपी असा वेश असायचा. ते फारसं बोलायचे

नाहीत. कधी फार कोणाला रागवायचेही नाहीत. त्यांच्याशी आपण जरा जास्त आगाऊ वागलो की काय अशी माझ्या चौथीत असलेल्या मनाला शंका आली. पण हेडमास्तरांनी प्रार्थनेच्या वेळी माझं नाव घेतलं नाही, उलट अगदी शांत स्वरात, मुलांनी खेळताना त्यांच्याबरोबरच्या मुलांशी खेळणं, म्हणजे त्यांना खोड्या करणं म्हणायचं असेल, कसं महत्त्वाचं आहे ते समजावून सांगितलं. बाकीच्या मुलांना त्याचा संदर्भ माहिती नसल्यामुळे त्यांना ते काय म्हणताहेत हे नीटसं कळलं नसेल. मला मात्र छानच कळलं. मी मनातल्या मनात खजिल झाले होते. आपण खोटं बोलण्यात वडिलांचं नाव वापरलं हेपण मनात जरा टोचत होतं. सरांचा चेहरा तसाच शांत व प्रेमळ होता. नंतरही ते मला कधी रागावले नाही.

तेव्हा झालेल्या फजित्या मस्तपैकी आठवतात. आता त्याचं हसू येतं. गणिताच्या पेपरमध्ये एखादी संख्या आकड्यात दिलेली ती अक्षरात लिहायची व अक्षरात दिलेली ती आकड्यात लिहायची असे. अगदी सोपं वाटायचं. एकदा अक्षरात संख्या लिहिली होती 'हजार' व ती उत्तरात आकड्यात लिहून दाखवायची होती. 'हजार' या शब्दानं मी गोंधळले. मला एक हजार म्हणजे एकावर तीन शून्यं हे नक्की माहिती होतं. पण नुसतं हजार म्हणजे काय बुवा ते समजेना. मग वाटलं, अक्षरातून एक वगळला; तसंच असणार. म्हणून मी आकड्यातून एक वगळून फक्त तीन शून्यं उत्तरात लिहिली. आपलं नक्की बरोबर आहे याची खात्री मला होती. उत्तराच्या तीन शून्यांवर मार्कांचं एक शून्य मिळाल्यावर नक्की कुठे गडबड झाली हे कळायलाही मला खूप काळ जावा लागला.

तेव्हा नीपचं शाईचं पेन वापरण्याची प्रथा होती. त्यामुळे शाई गळणं व शाईचं डाग असणं हा स्थायीभाव होता. हातावर, पांढऱ्या शर्टच्या बाहीवर, कॉलरवर, दप्तरावर शाईचे वेगवेगळ्या आकाराचे डाग असायलाच हवे. मग ती नीप सारखी खराब व्हायची, त्यातून शाई नीट यायची नाही. नाहीतर कधी भसाभस यायची. मग सारखं पेन झटकून नाहीतर नीपच्या फटीमध्ये टाचणी किंवा सेफ्टीपीन घालून शाईचा प्रवाह नीट सुरू करायचा प्रयत्न करायचा. तेव्हा कोणी बॉलपेन किंवा रिफिलचं पेन वापरताना दिसलं की ते अगदीच वाया गेलेले विद्यार्थी वाटायचे. आम्हाला काळ्या शिसपेन्सिलपासून शाईच्या पेनपर्यंत प्रमोशन व्हायला दोन-चार इयत्ता जाव्या लागल्या होत्या. बॉलपेननं अक्षर खराब होतं, अक्षर चांगलं होण्यासाठी फाऊंटन पेन वापरणं गरजेचं आहे असं बिंबवलं गेलं होतं.

सर्व प्रकारच्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीसाठी जिने ही महत्त्वाची जागा समजली जायची. प्रचंड घाईत, गर्दीत, धक्काबुक्की करत, धावपळत जिन्यांवर चालायची. पार्श्वभूमीला सुटी सुरू झाल्याची किंवा सुटी संपत आल्याची घंटा वाजत असायची. घंटा वाजवून सर्व शाळेच्या हालचाली आपल्या नियंत्रणाखाली ठेवणारा शिपाई म्हणजे शाळेचा सत्ताधीश वाटायचा.

वर्गातले काळपट झालेले बाक, डेस्क आठवतात. मुलं-मुली वेगवेगळे बसायचे. मुलामुलींनी आपापसात एकमेकांशी न बोलण्याचा तो जमाना होता. त्यामुळे त्या वयातच एकमेकांविषयी प्रचंड कुतूहल व थोडंफार आकर्षण सुरू झालं असावं. तेव्हा आरशाला फार काही स्थान असल्याचं आठवत नाही.

चिंचमलातपुरे हे नाव जसं आठवणीत राहिलं, तसंच अजून एक नाव लक्षात राहिलं ते म्हणजे 'हरणगावकर'. शिडशिडीत, उंच बाई होत्या. कुरळ्या केसांचा मागे छोटासा अंबाडा असायचा. नऊवार लुगड्यात असायच्या. त्यांचा सर्वांना भरपूर धाक असायचा. गणिताचे पाढे त्यांच्यामुळे रोज वर्गात म्हटले जायचे. ते आजही छान पाठ आहेत. तेव्हा कोणत्याही चुकीसाठी त्यांचा हात मार द्यायला चटकन पुढे यायचा.

मागच्या व्हरांड्यात दर शुक्रवारी पहिली ते चौथीचे वर्ग जमायचे. सरस्वतीचा फोटो मांडून त्याची पूजा व्हायची. मग सर्वांनी मिळून रामरक्षा म्हणायची. मी व माझी एक मैत्रीण सर्वांच्या पुढे उभं राहून रामरक्षा म्हणायचो. आमच्या मागे इतर सर्व म्हणायचे.

नागपूरला सायकलरिक्षाचं प्रस्थ होतं. शाळेत न्यायला रिक्षावाला यायचा. त्याच्या सायकलरिक्षामध्ये जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे फळ्या बसवल्या होत्या. त्यावर आम्ही सर्व बारकी मंडळी कोंबून बसायचो. ती रिक्षा अगदी हळूहळू जायची. चढाचा रस्ता आला की आमच्यातली त्यातल्या त्यात मोठी पोरंटोरं खाली उतरायची. रिक्षावाल्याबरोबर रिक्षा ढकलायला लागायची. रिक्षात बसलेल्यांमध्ये कुणी दादागिरी करणारे असायचे. बाकीचे मुळूमुळू त्यांचं ऐकायचे. सगळी वरात सावकाश शाळेपर्यंत पोचायची.

माझ्या आईला घरी गाणं शिकवायला कोणीतरी यायचं. ते गाणं शिकवायला येणारे गुरुजी माझ्या अंगात संचारायचे. मी मग मधल्या सुट्टीतल्या त्या चांगलं वागायच्या मूडमध्ये, माझ्या चार मैत्रिणींना घेऊन, वर्गातल्या एका कोपऱ्यात बसायचे आणि त्यांना गाणं शिकवायचे. त्याही बिचाऱ्या मी म्हणून दाखवेन तसं गायचा प्रयत्न करायच्या. त्यात मजेची गोष्ट अशी होती व आहे, की मला अजिबात गाणं म्हणता येत नाही. तेव्हाही यायचं नाही. सूर-ताल याच्याशी माझा काही संबंध नाही. पण मी तेव्हा शिकवायचे मात्र आत्मविश्वासानं.

काहीसं असं होतं ते गाणं-

नाचत बागडत<br>
डोंगर उतरून<br>
गावाच्या वेशीमंदी<br>
सोन्याचं येतं उन्ह

आज त्यानंतर खूप खूप वर्षांनी त्या सोन्याच्या उन्हाचे काही कवडसे अंगावर घेताना खूप मजा आली.

**- डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश आय हॉस्पिटल
७५९/७५/३ डेक्कन जिमखाना,
कॅफे गुडलक मागे, पुणे-४११००४
भ्रमणध्वनी - ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

# वसंत खेर – ‘झपाझप पावलं टाकणारं’ एक वादळ

**प्रा. कृष्णकुमार गावंड**

२३ एप्रिल २०१२ हा दिवस उजाडला आणि वसंत खेर नावाचं वादळ शांत झालं. आपल्या अंगी असलेल्या अष्टपैलू कलागुणांमुळे, प्रतिभा व निष्ठा यांच्या अजोड मिश्रणामुळे साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रात त्यानं स्वत:ची ओळख निर्माण केली. याचबरोबर अन्यायाविरुद्ध चीड, कोणतीही भीड न बाळगता प्रस्थापितांविरुद्ध बोलण्याचे धैर्य, वेळप्रसंगी बंडही पुकारण्याची तयारी, या गोष्टींमुळे त्याचं व्यक्तिमत्त्व वादळी ठरलं.

आम्ही दादरच्या छबिलदास शाळेचे विद्यार्थी; प्राथमिक शाळेच्या २ री ‘ब’ या तुकडीमध्ये एकाच बाकावर बसणारे, अगदी ११वीपर्यंत एकमेकांचे सोबती. यामुळे खेर याच्या कलागुणांचा, विशेषत: चित्रकलेवरील प्रेम, अप्रतिम रांगोळ्या काढण्याचं कौशल्य, माझ्या घरी तसंच त्याच्या ‘मेअर बिल्डिंग’मध्ये गणेशोत्सवात केलेली आरास, या गोष्टींचा मी पुरेपूर आनंद लुटला आहे.

घरातून थोडा विरोध असल्यामुळे त्याची जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्‌ला जायची इच्छा पूर्ण न झाल्यानं तो कॉमर्स क्षेत्राकडे मनाविरुद्धच वळला. कुटुंबीयांचे जवळचे मित्र श्रीकांत आंबेडकरांमुळे, १८ वर्षांचा असतानाच, क्रॉम्प्टन ग्रीव्हज्‌सारख्या कंपनीत खेर नोकरीला लागला. मॉर्निंग कॉलेज करून बी.कॉम. झाला.

कंपनीच्या अकाउंट्स डिपार्टमेंटमध्ये त्याचं मन रमेना. कलागुण स्वस्थ बसू देईनात. म्हणून रचना संसदमधून टेक्स्टाइल डिझाइनिंगचा पार्ट टाइम कोर्स त्यानं पूर्ण केला. आपल्या अभ्यासू वृत्तीनं त्यानं टेक्स्टाइल इंडस्ट्रीचा पूर्ण मार्केट स्टडीही केला. स्वत:चा टेक्स्टाइल डिझाइनिंगचा क्लास सुरू केला व त्यात विद्यार्थ्यांना तयार करून स्वत:चं 'LA SHALAKA' नावाचं डिझाइन डिपार्टमेंट सुरू केलं. त्याचं रूपांतर नंतर कमर्शियल डिझाइन डिपार्टमेंटमध्ये झालं. त्यानंतर जाहिरात क्षेत्रातही एक हुशार कॉपीरायटर व व्हिज्युअलायझर म्हणून त्यानं स्थान निर्माण केलं.

आम्ही आर्ट डिपार्टमेंट दादरमध्ये सुरू करू शकलो ते आमचा वर्गमित्र श्रीकांत कुळकर्णीमुळे. त्यानं दादरची विष्णू निवासमधली रूम त्यासाठी दिली. आम्ही तिघंही संगीतकार शंकर–जयकिशन यांचे परमभक्त! लहानपणापासून आमच्यावर संस्कार झाले रेडिओ सिलोनचे. याच वातावरणातून आमच्या ‘सिंफनी’ संस्थेचा जन्म झाला. खेरच्या धाडसी वृत्तीमुळे आम्ही संगीतकार शंकरजींना प्रत्यक्ष भेटलो. त्यांची अनेक रेकॉर्डिंग ऐकली. त्यांच्याशी संवाद साधू शकलो. यामुळे आमच्या ‘याद – ए– शंकर–जयकिशन’ कार्यक्रमाच्या शुभारंभाला व रौप्यमहोत्सवी कार्यक्रमाला स्वत: शंकरजी उपस्थित राहिले. आम्हाला केवळ आशीर्वाद देण्यासाठी.

खेरच्याच संकल्पनेतून ‘झपाटा’ ऑर्केस्ट्राची निर्मिती झाली. ‘झपाटा’च्या नावीन्यपूर्ण सादरीकरणामुळे ऑर्केस्ट्रा क्षेत्रात क्रांती झाली. आज अनेक टीव्ही चॅनेल्सवर आपण बरेच कार्यक्रम पाहतो, त्याचा पाया असतो कॉमेडी आणि मेलडी यांचं अनोखं ब्लेंड, जे ‘झपाटा’मुळे सर्वसामान्यांच्या हृदयात कायमचा ठसा उमटवून गेलं. केवळ तरुणाईला आकर्षित करणाऱ्या, साऊंड बाइट



**प्रा. कृष्णकुमार गावंड, श्रीकांत कुलकर्णी आणि वसंत खेर**

इफेक्ट्समध्ये अडकलेल्या टिपिकल ऑर्केस्ट्राला ‘झपाटा’मुळे फॅमिली ऑडियन्स मिळाला.

‘झपाटा’च्या यशाचं एक महत्त्वपूर्ण कारण म्हणजे खेरनं केलेली आगळीवेगळी, नावीन्यपूर्ण जाहिरात,

‘कुठेही असा, आम्ही आपल्याला झपाटलेले असते.’

‘जगाला ओरडून सांगा, आम्ही झपाटलेले आहोत.’

‘झपाझप पावले टाका.’

या कॅच लाइन्स किंवा थीम्स घेऊन केलेल्या वैविध्यपूर्ण जाहिरातींनी अक्षरश: खळबळ माजवली. ‘झपाटा’ जाहिरातींवर परिसंवाद घडवून आणले गेले. अनेक प्रदर्शनं आखली गेली. मनोरंजन क्षेत्रात ‘झपाटा’ एक ब्रॅण्ड बनलं. ‘झपाटा’ नावानं दुकानं निघाली. ‘झपाटा’ घोडा डर्बी जिंकला.

या गुडविलचा उत्कृष्टपणे वापर करून खेरनं ‘झपाटा मार्केटिंग’ नावाची कॅसेट कंपनी काढली. पु.ल. देशपांडेंचं साहित्य, आचार्य अत्रे, स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्वत:च्या आवाजातील भाषणं यामुळे झपाटा मार्केटिंगला एक उच्च दर्जा प्राप्त झाला. खेरच्या संकल्पनेतून भक्तिरसपूर्ण, नाट्यसंगीतावर आधारित, हळव्या प्रेमाच्या कविता, इत्यादी साहित्यातले अनेक प्रकार सोप्या पद्धतीनं रसिकांपर्यंत पोचले. या क्षेत्रातील नामवंत मंडळींचा सहभाग ‘झपाटा’ला लागला. यामध्ये अजित कडकडे, नंदू होनप, अनिल मोहिले, चारुदत्त आफळे, सुरेश भट, जगदीश खेबुडकर, चंद्रशेखर गोखले, दिलीप प्रभावळकर, डॉ. नरेंद्र जाधव, शरद उपाध्ये इत्यादी चतुरस्त्र मंडळींबरोबर खुद्द ‘लता-आशा’ यांचंही योगदान ‘झपाटा’ला लाभलं.


कला, साहित्य-संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या ‘झपाटा’ला अनेक वेळा समाजातून निष्कारण उपेक्षेला सामोरं जावं लागलं, क्षुल्लक गोष्टींकरता. सामान्य हक्काकरिता खेरला अनेकदा झगडावं लागलं. विशेषत: रंगभूमीवरील असमानता, भेदाभेद आम्ही अनेकदा अनुभवली, सहन केली. राज्य सरकार, नगरपालिकेच्या काही जाचक नियमांमुळे आमच्यासारख्या ऑर्केस्ट्राच्या निर्मात्याला अनेक अडचणींना आजही तोंड द्यावं लागतं. ‘झपाटा’च्या जाहिरातीतून याविरुद्ध आवाज उठवला. केवळ ऑर्केस्ट्राच नव्हे तर रंगभूमीवर परफॉर्म करणाऱ्या सर्व कलाकारांना समान हक्क मिळावेत यासाठी गोविंद तळवलकर (माजी संपादक, महाराष्ट्र टाइम्स), विजय तेंडुलकर यांच्याशी खेरनं तार्किक चर्चा केली, पण यामुळे सर्वांसाठी भांडणारा खेर जास्तच उपेक्षिला गेला.

असं असूनसुद्धा आयुष्याच्या शेवटपर्यंत खेर सतत नावीन्याचा शोध घेत राहिला. नुकताच त्यानं ‘मराठमोळा झपाटा’ या शीर्षकाखाली कार्यक्रमांची एक मालिकाच गुंफायचा संकल्प सोडला होता. यासाठी त्याचे मित्र अनंत भालेकर व स्व. अनिल मोहिले यांनी सक्रिय भाग घेतला. या मालिकेतील पहिलं पुष्प स्व. वसंत प्रभू यांना वाहण्यात आलं. पण नंतरची पुष्पं गुंफण्यापूर्वीच ‘वसंता’ला दृष्ट लागली आणि २३ एप्रिलला त्यानं आपला निरोप घेतला.

आज खेरनं मनोरंजन क्षेत्रातील कलाकारांना दिलेला संदेश लक्षात ठेवला तरी ती त्याला वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरेल-

‘झपाझप पावलं टाका.’

**– प्रा. कृष्णकुमार गावंड**


**मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.**

# मनस्वी

## बाबूराव चंदावार

बाबूराव चंदावार यांचे आत्मकथन भारताच्या राजकीय इतिहासातील एक अत्यंत रोमहर्षक कालखंड आहे. आचार्य विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण तसेच जेपी आणि इंदिरा गांधी यांच्यातील व्यक्तिसंबंधांवर अधिकारवाणीने लिहिणारे बाबूराव हे एकमेव म्हणावे लागतील. बालवयातच रागावून घर सोडले आणि बाबूराव सार्वजनिक कार्यात खेचले गेले. या प्रवासात त्यांना उत्तुंग उंचीचे अनेक मार्गदर्शक भेटले आणि त्यांच्या छायेत बाबुरावांची प्रगती होत गेली. कधीही आपल्या तत्त्वाबरोबर तडजोड करण्यास नकार देणारे बाबूराव, विनोबा आणि जेपी यांना सारखेच प्रिय होते. आपले अंत:करण दोघेही बाबुरावांसमोर खुले करत असत.
बाबुरावांचे आत्मकथन हा भारताच्या राष्ट्रीय इतिहासातील एक अमोल दस्तऐवज आहे.




# ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे








RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


को हेतु सेन्ट्रलाइट
Centralites for Customers

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
Central Bank of India

1911 पासून आपल्यासाठी "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

आयएसओ 27001:2005 प्रमाणित



# सेन्ट सुपर+

## 555 दिवसांच्या ठेवीवर

(30-06-2012 पर्यंत)

# आता मिळवा अधिक

| सामान्य जनतेसाठी | वरिष्ठ नागरिकांसाठी |
|---|---|
| 9.10% प्रतिवर्ष व्याज | 9.60% प्रतिवर्ष व्याज |

*अटी लागू

अधिक माहितीसाठी कृपया www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा
किंवा कस्टमर केअर नं.: 1800 200 1911 वर कॉल करा (टोल फ्री)


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.